बुधवार, २७ जुलै २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १०
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग


मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर मराठी माणसाची आठवण -ना. राणे/२

वारे येथील स्मशानभूमीची दुरवस्था; प्रशासनाचे दुर्लक्ष/५

राज्य क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला १३ पदके/८


## नऊ महापालिकांच्या आरक्षणाची ५ ऑगस्टला सोडत

**मुंबई :** औरंगाबाद, लातूर, परभणी, चंद्रपूर, भिवंडी-निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा-भाईंदर व नांदेड-वाघाळा या नऊ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ५ ऑगस्ट रोजी आरक्षित जागांची सोडत काढण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिलेत. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला यांची आरक्षण सोडत काढल्यानंतर ६ ऑगस्ट रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध केले जाईल. त्यावर ६ ते १२ ऑगस्ट या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. दाखल हरकती व सूचनांचा विचार करून प्रभागनिहाय अंतिम आरक्षण २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केले जाईल, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

# मी फिक्स मॅच पाहत नाही

## उद्धव ठाकरेंच्या मुलाखतीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेतील बंड आणि त्यामुळे राज्यात झालेल्या सत्तांतरानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रथमच जाहीर मुलाखतीद्वारे भाष्य केले आहे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांनी ही मुलाखत घेतली. या मुलाखतीवर राज्याचे उपमुख्यमंत्री व भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी संक्षिप्त प्रतिक्रिया दिली. मी फिक्स मॅच पाहत नाही, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

उद्धव ठाकरे यांनी आजच्या मुलाखतीमधून राज्यातील सरकार आणि भाजपवर टीका केली आहे, त्याबाबत काय म्हणाल, असे विचारले असता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी फिक्स मॅच पाहत नाही. मी लाइव्ह मॅच पाहतो. खरी मॅच बघतो. ही मुलाखत म्हणजे फिक्स मॅच आहे. ती पाहून त्यावर काय प्रतिक्रिया द्यायची? काही दिवसांनी सगळ्या गोष्टी स्पष्ट होतील तेव्हा प्रतिक्रिया देऊ.

या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या वढू येथील नियोजित स्मारकाला स्थगिती दिल्याचा केलेला आरोप फेटाळून लावला. ते म्हणाले, विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी वढू येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासंदर्भातील कामांना आमच्या सरकारने स्थगिती दिल्याचा आरोप केला आहे. दादांसारख्या माणसाने असा आरोप करताना फाईलवर काय लिहिलंय हे पाहिले पाहिजे होते. मी स्वतःच्या हस्ताक्षरात फाईलवर लिहिलंय की, या कामाला स्थगिती देणे योग्य होणार नाही. उलट या संदर्भात काय काय कामे घेतली आहेत त्या संदर्भातील सादरीकरण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमोर करावे. म्हणजे त्यात काही कामे राहिली असतील तर त्याचाही समावेश करण्यात येईल, अशी सूचना केल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. (पान २ वर..)



### अडीच वर्षे संपत्ती झाली, आता पुढची अडीच वर्षे सिंपथी

### मनसेने लगावला टोला

**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीवर राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून प्रतिक्रिया आली असून ही मुलाखत म्हणजे सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न असल्याचा टोला मनसेने लगावला आहे.

उद्धव ठाकरेंची मुलाखत मंगळवारी प्रकाशित झाल्यानंतर मनसेचे नेते संदीप देशपांडेंनी दोन ट्वीट करीत मुलाखतीवरून शिवसेनेला लक्ष्य केले आहे. अडीच वर्षे संपत्ती झाली. आता पुढची अडीच वर्षे सिंपथी, असे देशपांडे यांनी म्हटलंय. यासोबतच त्यांनी एक व्यंगचित्र शेअर केले आहे. त्यात संजय राऊत हे उद्धव ठाकरेंच्या हातात एक कागद देताना दिसत आहे. हे घ्या 'साहेबां'नी पाठवलेले मुलाखतीसाठीचे प्रश्न व उत्तरे असे राऊतांना म्हणताना दाखवण्यात आलेत, तर उद्धव हे कागद हातात घेताना, बघा आता कशी देतो मी खणखणीत उत्तरे, असे म्हणताना दाखवलेत.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पनवेल उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय साहित्याचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज आणि राज्य शासनाच्या इसीआरपी अंतर्गत पनवेल येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाला विविध वैद्यकीय मेडिकल साहित्य देण्यात आले असून याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते मंगळवारी (दि. २६) झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी जोपर्यंत डायलेसिससाठी अधिकृत टेक्निशियन उपलब्ध होत नाही तोपर्यंत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून टेक्निशियन देण्यात येईल, असे जाहीर केले.

उपजिल्हा रुग्णालयाला रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने एक सोनोग्राफी मशीन, पाच बेबी वॉर्मर, दोन रेडियंट हिटर, एक पिडीयाट्रीक व्हेंटिलेटर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईजने पिडीयाट्रीक सर्जरीसाठी लागणारी इन्स्ट्रुमेंट आणि राज्य शासनाच्या इसीआरपी अंतर्गत ३२ पिडीयाट्रीक आयसीयु बेड, ४० अडल्ट आयसीयु बेड आणि तीन केएल क्षमतेचा लिक्वीड मेडिकल ऑक्सिजन टँक देण्यात आला आहे. या सर्व साहित्याचा उद्घाटन सोहळा मंगळवारी रुग्णालयात झाला.

या कार्यक्रमास महापालिकेचे माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, रोटरी क्लब ऑफ सनराईजचे डॉ. विजय कुलकर्णी, श्री. ठाकरे, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन संकपाळ, डॉ. कालेल आदी मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)

## राज्यसभेतील १९ खासदार निलंबित

### संसद अधिवेशनादरम्यान दुसऱ्यांदा कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पावसाळी अधिवेशनात विविध मुद्द्यांवरून विरोधकांचा गदारोळ सुरूच असून मंगळवारी (दि. २६) सभागृहाच्या वेलमध्ये घुसून घोषणाबाजी केल्यामुळे राज्यसभेतील १९ खासदारांना आठवडाभरासाठी निलंबित करण्यात आले आहे. याआधी सोमवारी गोंधळ घालणाऱ्या काँग्रेसच्या चार खासदारांना निलंबित करण्यात आले होते.

संसदेत विरोधक सातत्याने आंदोलन करीत आहेत. मंगळवारी सभागृहाचे कामकाज सुरू होताच राज्यसभेत विरोधी खासदारांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. सभागृहात घोषणाबाजी करीत विरोधी खासदार वेलच्या जवळ आले. या खासदारांना सभापतींकडून वारंवार जागेवर बसण्याचा आग्रह केला जात होता, मात्र ते ऐकत नसल्याने अखेर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

निलंबन झालेल्या खासदारांमध्ये सुष्मिता देव, मौसम नूर, शांता छेत्री, डोला सेन, डॉ. शंतनु सेन, अबीर रंजन बिस्वास, नदीम-उल-हक (तृणमूल काँग्रेस), मोहम्मद अब्दुल्ला, एस. कल्याणसुंदरम, आर. गिररंजन, एन. आर. एलांगो, एम. षणमुगम, कनिमोझी (द्रमुक), एल. यादव, आर. वड्डीराजू, दामोदर राव दिवाकोंडा (तेलंगणा राष्ट्रीय समिती), ए. ए. रहीम, व्ही. शिवदासन, (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), पी संदोष कुमार (कम्युनिस्ट पक्ष) यांचा समावेश आहे.

## मुंबई मनपा आरक्षण शुक्रवारी होणार जाहीर

**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. २९) वांद्रे येथील बालगंधर्व रंगमंदिर सभागृहात प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीमध्ये इतर मागासवर्गासाठी ६३ प्रभागांतील आरक्षण जाहीर होणार असून महिला आरक्षित प्रभागांसाठी सोडत काढण्यात येईल. या आरक्षणावर २ ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना नोंदवता येणार आहेत, तर १३ जून रोजी अंतिम आरक्षण सोडत प्रसिद्ध होईल.

## सोनिया गांधींची ईडीकडून पुन्हा चौकशी

### आंदोलक राहुल गांधींना पोलिसांनी घेतले ताब्यात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

'नॅशनल हेराल्ड' आर्थिक गैरव्यवहारप्रकरणात सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांची मंगळवारी (दि. २६) पुन्हा एकदा चौकशी केली. त्यानंतर काँग्रेसकडून निदर्शने करण्यात आली. या वेळी दिल्लीच्या विजय चौक परिसरात झालेल्या आंदोलनात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधीही ठिय्या देऊन बसले होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

ईडीकडून सोनिया गांधी यांची नॅशनल हेराल्ड मनी लॉण्डरिंगप्रकरणी चौकशी केली जात आहे. द असोसिएटेड जर्नल लिमिटेड या कंपनीद्वारे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्थापन केलेले नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र इ.स. २००८मध्ये बंद पडले. त्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या यंग इंडिया कंपनीने इ.स. २०१०मध्ये ते विकत घेतले. काँग्रेसने 'नॅशनल हेराल्ड'ला ९० कोटींचे कर्ज दिले होते. 'द असोसिएटेड जर्नल'ची संपत्ती हडपण्यासाठी ते अवघ्या ५० लाखांत खरेदी केल्याचा आरोप भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी केला होता. यंग इंडिया कंपनीचे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स सोनिया आणि राहुल यांच्या नावावर असल्यामुळे प्रकरणाला महत्त्व आले आहे.

चौकशीसाठी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी मंगळवारी ईडीच्या दिल्ली कार्यालयात हजर झाल्या. त्यांच्यासोबत मुलगा राहुल गांधी आणि मुलगी प्रियंका गांधी-वाड्रा होत्या. सोनिया यांच्या चौकशीविरोधात काँग्रेसच्या मोर्चादरम्यान राहुल गांधी यांच्यासह पक्षाच्या अनेक नेत्यांना दिल्ली पोलिसांनी विजय चौकात ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

## निवडक

### पुण्यातील शाळेच्या आवारात आढळला बॉम्ब

**पुणे :** येथील मांजरीतील अण्णासाहेब मगर विद्यालयाच्या परिसरात मंगळवारी (दि. २६) जुना बॉम्ब (ग्रेनेड) आढळून आला. त्यामुळे परिसरात घबराट उडाली. या घटनेची माहिती मिळताच बॉम्ब शोधक व नाशक पथकाने घटनास्थळी धाव घेऊन तातडीने बॉम्ब निकामी केला. हा बॉम्ब जुना असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तो निकामी करण्यात आला.

### फारूख अब्दुल्ला यांच्यावर ईडीकडून आरोपपत्र दाखल

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीर क्रिकेट असोसिएशन (जेकेसीए)मधील आर्थिक अफरातफरीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रात जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांच्यासह अहसान अहमद मिर्झा, मीर मंजूर गझनफर व इतरांची नावे आहेत. या सर्वांना २७ ऑगस्टला हजर राहण्यासाठी न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

## चौलच्या रामेश्वर पुष्करणीत दुर्मीळ पाणकावळ्यांची सैर

**रेवदंडा : प्रतिनिधी**



पावसाळ्यात तुडूंब भरलेल्या चौल येथील रामेश्वर पुष्करणीत दुर्मीळ पाणकावळ्यांचे आगमन झाले आहे. त्यांचे पोहणे, मासेमारीसाठी पाण्यात खोलवर डुबकी मारणे आनंददायी चित्र आहे.

चौल येथील रामेश्वर पुष्करणीत गेले काही दिवस तीन पाणकावळे सैर करताना दिसून येत आहेत. चकचकीत काळसर वर्णाचा, काळ्या पिसावर हिरवट निळसर झाक, निमुळती, चपटी व टोकाशी किंचित बाकदार पिवळसर काळी चोच, लांबलचक सडपातळ मान, गळ्यावर पांढुरका ठिपका आणि लांब व कडक शेपटी लक्ष वेधून घेते. कावळ्यासारखा दिसतो म्हणून त्याला पाणकावळा म्हटले जाते. त्यास कारा, कोकोक, करढोल, कामरा अशा विविध नावांनीही ओळखले जाते.

पाणकावळा हा भारतात सरोवरे, नद्या, नाले, पाणथळी, खांड्याच्या प्रदेशात एकटा अथवा थव्याने आढळतो. सध्या चौल येथील रामेश्वर पुष्पकरणीत स्थानिकांनी मासे सोडल्याने ते खाण्यासाठी तीन पाणकावळे हजर झाले आहेत. पुष्करणीत ज्या वेळी रेलचेल नसते, शुकशुकाट असतो त्या वेळी हे पाणकावळे पाण्यात डुबकी मारून मासे पकडतात.

पुष्करणीत दिसणारे हे पाणकावळे नजीकच्या नारळाच्या झाडाच्या झापावर सुपासारखे पंख पसरवून सुकवितात. पंखातील पाण्याचा भार हलका झाल्यावर मस्त हवेत झोकून देऊन पाण्याला समांतर हातभर उडताना पाहताना आगळीकता वाटते.




पनवेल : भाजप प्रदेश कार्यकारिणीची बैठक नुकतीच पनवेल येथे झाली. या बैठकीच्या निमित्ताने शहरात लावण्यात आलेले पक्षाचे झेंडे, फलक, पताका व इतर साहित्य भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निर्देशानुसार काढून घेत परिसर पूर्ववत करण्यात आला आहे. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते.




# मुंबई मनपा निवडणुकीत शिवसेनेचा पराभव होईल -सुधीर मुनगंटीवार

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी ज्याप्रकारे आज मुलाखत दिली आहे, अशा गोष्टी जनतेला पसंत नाहीत. मी रेकॉर्डवर सांगतो, उद्धव ठाकरे यांच्या अशा मुलाखतींमुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेला पराभूत व्हावे लागेल, असे भाजप नेते माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले. ते एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.



उद्धव ठाकरे कौटुंबिक वर्तमानपत्रात मुलाखत देतात. इतरांवर मनसोक्त टीका करतात. पाठीत खंजीर खुपसला, असे सांगतात. जनतेला हे अजिबात पसंत नाही. उद्धव ठाकरे यांच्या अशा प्रकारच्या मुलाखतीचा फटका शिवसेनेला मुंबई महापालिकेत बसू शकतो, असा दावा सुधीर मुनगंटीवार यांनी केला. उद्धव ठाकरे आपल्या मुलाखतीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या चुका सांगत नाहीत. आज ते सत्तापालट होताना हजारो कोटींचा खर्च झाल्याचे म्हणतात. तुम्ही जेव्हा आमची साथ सोडली तेव्हा हजारो कोटींचा खर्च झाला होता का? असा सवाल मुनगंटीवार यांनी विचारला. मला जबरदस्तीने आणि इच्छा नसताना मुख्यमंत्री केले, असे उद्धव ठाकरे सांगतात. असे कोणी जबरदस्तीने मुख्यमंत्री कसे काय करू शकते? हे प्रश्न जनतेच्या मनात असल्याचेही ते म्हणाले.

महाराष्ट्र तोडणार हे वाक्य खूप जुने झाले असून, अशा प्रकरची वाक्य केवळ आणि केवळ सहानुभूती घेण्यासाठी बोलली जात आहेत. मुंबई तोडण्याचे महापाप तर काँग्रेसचेच असून, तुम्ही अजुनही काँग्रेसच्या मांडीवर असल्याचा हल्लाबोलही त्यांनी केला. उद्धव ठाकरेंची ही मुलाखत पारिवारिक होती, तसेच हा एका हताश झालेल्या माजी मुख्यमंत्र्यांकडून जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी केलेला असफल प्रयत्न आहे, असेही मुनगंटीवार या वेळी म्हणाले.

### मग मोदींचा फोटो का वापरलात?

***शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे इतरांना म्हणतात की, माझ्या वडिलांचा फोटो न वापरता निवडून या, पण मग पंतप्रधान नरेंद्र मोदीही तुमचे वडिल नव्हते. मग तुम्ही २०१९च्या निवडणुकीवेळी वरळी मतदारसंघातील बॅनर्सवर नरेंद्र मोदी यांचा फोटो का वापरला? असा सवाल भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी मुलाखतीदरम्यान उपस्थित केला.***


## मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर मराठी माणसाची आठवण –नारायण राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंच्या मुलाखतीवर अनेक नेत्यांनी टीका करण्यास सुरुवात केली असून, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीदेखील ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मी २००५मध्ये ज्या वेळी शिवसेना सोडली त्या वेळी मला संपवण्यासाठी अनेकांना सुपाऱ्या देण्यात आल्या होत्या, मात्र मी त्यावेळी यावर काहीच बोललो नाही. कारण या परिस्थितीला तोंड द्यायला समर्थ होतो. या सर्व परिस्थीतीत वाचलो तो केवळ माझ्या आई–वडिलांच्या पुण्याईमुळे वाचलो. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर मराठी माणसाची आठवण झाली. मी त्यांना गेल्या ४० वर्षांपासून ओळखत असून त्यांच्या अंगात दुष्टपणा आणि कपटीपणा भरलेला आहे, असा आरोप ना. राणे यांनी केला.

सत्तेतील अडीच वर्षांत ठाकरेंनी कोणतेच काम केलेले नसून आजरपण आणि मातोश्री या दोन्हीमध्येच त्यांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ गेला, अशी टीकादेखील ना. राणेंनी केली. आज 'सामना'मध्ये प्रकाशित झालेली ठाकरेंची मुलाखत ही ठरवलेल्या प्रश्नांवर होती, असा आरोपही त्यांनी या वेळी बोलताना केला.

ठाकरेंना पदावरून पायउतार केल्यानंतर संजय राऊत मनातून खूश असून ठाकरेंची मुलाखत म्हणजे राऊतांनी ठाकरेंच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. संजय राऊत म्हणजे बनावट पत्रकार असून, त्यांना काही दर्जा नसल्याचा घणाघातही राणे यांनी केला आहे. राऊत उद्धव ठाकरेंना त्यांच्या तालावर नाचवत असल्याचेही राणे म्हणाले. शिवसेनेचा वारसा रक्ताने नाही तर विचाराने चालत असतो. शिवसेनेत असताना आई–वडिलांचे ऐकले नाही अन् आता काय म्हणता शिवसेना आमची आहे? उद्धव ठाकरेंनी प्रेम, विश्वास दिला नाही, तो एकनाथ शिंदेंनी दिला. खरेतर संजय राऊतांनी शिवसेना फोडली असून या कामगिरीनंतर राऊत मनातून खूश आहेत, असेही राणे यांनी या वेळी म्हटले.



## गुंतवणुकीच्या आमिषाने गंडा

**पनवेल : वार्ताहर**

नोकरीच्या शोधात असलेल्या एका व्यक्तीची गुंतवणुकीचे आमिष दाखवून तीन लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणी अज्ञाताविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

भरतकुमार भानुशाली हे वर्षभरापूर्वी इंटरनेटवरून नोकरी शोधत होते. त्यांना एक जाहिरात निदर्शनास आली. त्यांनी जाहिरातीमधील नंबरवर संपर्क साधून विचारणा केली. समोरच्या व्यक्तीने आपले नाव प्रकाश सांगून त्याच्या वेबसाईटवरील वस्तूमध्ये रक्कम गुंतवल्यास त्यावर कमिशन मिळेल, असे सांगितले. त्यानंतर कंपनीची लिंक पाठवून त्यात तपशील व २३८ रुपये भरण्यास सांगितले, त्याप्रमाणे भानुशाली यांनी माहिती व रक्कम भरल्यानंतर त्यांच्या खात्यात ३६५ रुपये जमा झाले. त्यामुळे भानुषाली यांनी ॲपमध्ये सुरुवातीला ९,५०० रुपये भरले. त्यानंतर प्रकाशने त्यांच्या खात्यात कमिशन व मूळ रकमेसह १०,८०० रुपये पाठवून त्यांचा विश्वास संपादन केला. भानुषाली यांनी पैसे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. भानुशालींनी तीन लाख २० हजार रुपये गुंतवले, मात्र भामट्याने पैसे परत न करता फसवणूक केली.

# गणेशोत्सवात बत्ती गूल सहन करणार नाही

## ■ माजी आमदार संदीप नाईक यांचा महावितरणला इशारा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईकर विविध वीज समस्यांनी त्रस्त असून माजी आमदार संदीप नाईक यांनी मंगळवारी (दि. २६) महावितरणचे अधीक्षक अभियंता राजाराम माने यांची भेट घेत, यापुढे हलगर्जीपणा चालणार नाही. कारभार सुधारला नाही तर जनआंदोलन, छेडू असा इशारा दिला.

वाशी येथील महावितरणच्या कार्यालयात संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवक अनंत सुतार, केशव म्हात्रे, लीलाधर नाईक, शशिकांत भोईर, घनश्याम मढवी, लक्ष्मण पाटील, रविकांत पाटील, अशोक पाटील, बाळकृष्ण पाटील, पुरुषोत्तम भोईर, माजी नगरसेविका सायली शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुदर्शन जिरगे, राजेश मढवी, विजय वाळुंज, अजय वाळुंज, गणेश सकपाळ, चेतन पाटील, नारायण शिंदे यांचे शिष्टमंडळ व महावितरणच्या वतीने वरिष्ठ अभियंता बोरसे उपस्थित होते.

आठवड्यातून तीन दिवस विद्युत पुरवठा खंडित होतो तो सुरळीत करा, जीर्ण केबल बदला, अधिकारी आणि कर्मचारी गरजेच्या वेळीच उपलब्ध नसतात, अशी लोकप्रतिनिधींची तक्रार असते. पुरेसे अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध झालेच पाहिजेत, असेही संदीप नाईक यांनी स्पष्ट केले.

### आमदार निधीसाठी विनंती करणार

***विजेची कामे करण्यासाठी निधी नसतो, अशी महावितरणची नेहमीचीच तक्रार असते. त्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा देण्यासाठी भाजप आमदार गणेश नाईक यांना या कामासाठी आमदार निधी देण्याबाबत संदीप नाईक मागणी करणार आहेत. या निधीमधून नवी मुंबईत सर्व भागात छोटी–मोठी विजेची कामे हाती घेण्यात येणार आहेत.***

### सूचनांवर तातडीने कार्यवाही करू –अधीक्षक अभियंता राजाराम माने

***वीज समस्या सोडविण्याबाबत संदीप नाईक यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांवर मुद्देनिहाय तत्परतेने कार्यवाही करू, असा सकारात्मक प्रतिसाद अधीक्षक अभियंता राजाराम माने यांनी आजच्या बैठकीत दिला आहे.***

## संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त भाजी मार्केटमधील बालाजी मंदिराच्या बाजूला असणाऱ्या नामदेव शिंपी विठ्ठल मंदिरामध्ये मंगळवारी (दि. २६) अभिवादन करण्यात आले. या वेळी शिंपी समाजाच्या वतीने सामाजिक, सांस्कृतिक व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



शिंपी समाज अध्यक्ष विनायक नाझरे यांच्या हस्ते संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी समाजबांधवांना मार्गदर्शन केले. सुयोग डोंगरे यांनी अभंग सादर केले. यानिमित्ताने शिंपी समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला, तसेच १०वीच्या परीक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला. दुपारी आरती झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# कमळ महिला पतपेढीचा ११ टक्के लाभांश जाहीर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील महिलांची पनवेल येथील कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित या संस्थेची २७वी वार्षिक सभा संस्थेच्या अध्यक्षा मालती आंग्रे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. २३) ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात झाली. सन २०२१–२२ सालाकरिता सभासदांच्या भागभांडवलावर संस्थेने कोरोनामुळे असलेल्या मंदीच्या परिस्थीतीतही ११ टक्के लाभांश जाहीर केला. सभेच्या सुरुवातीला संस्थेच्या संचालिका पूर्वा खेडेकर यांनी, २०२१–२२मध्ये मृत पावलेल्या सभासद, ठेवीदार व हितचिंतकांना संस्थेतर्फे श्रद्धांजली वाहिली. त्याचबरोबर नवीन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे स्वागत करण्यात आले.



संस्थेच्या अध्यक्षा मालती आंग्रे यांनी, संस्थेच्या संचालिका मंडळ २०२२–२७ या पंचवार्षिक निवडणुकीत पुन्हा एकदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनतर त्यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेत प्रगतीचे श्रेय सभासद, सर्व कर्मचारी वर्ग, पिग्मी एजंट तसेच संचालक मंडळाला देऊन पुढेही असेच सहकार्य मिळावे, अशी आशा व्यक्त केली, तसेच संस्थेचे संस्थापक तथा तज्ज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर यांचे विशेष आभार मानले.

संस्थेने नेहमीप्रमाणे ज्या सभासदांनी आर्थिक वर्षामध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या १६ सभासदांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. इयत्ता १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेल्या आणि ७० टक्केच्या वर गुण मिळवलेल्या १२ पाल्यांचा सत्कार करण्यात आला. स्वल्पबचत प्रतिनिधींमध्ये राजू भोईर, दुर्वास ताटे, ओंकार शेट्ये यांचाही सत्कार करण्यात आला. संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी कोरोना महामारीच्या काळात अतिशय चांगली कामगिरी केली, अशा सर्व कर्मचाऱ्यांचा या सभेत अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी उपाध्यक्षा विभावरी कुळकर्णी, पूर्वा खेडेकर, पूनम बांदोडकर, उर्मिला वंजारी, अर्चना कुळकर्णी, चित्रा मानकामे, वृंदा वत्सराज, मनिषा विसपुते तसेच सुषमा जांभळे या संचालिका उपस्थित होत्या.

## तरुणाने वाचवले वृद्ध प्रवाशाचे प्राण


**कर्जत : बातमीदार**

कर्जत रेल्वेस्थानकात मंगळवारी (दि. २६) खोपोलीकडे जाणाऱ्या लोकलमधून एका वृद्ध प्रवाशाला तरुणाने वाचविले.

पोसरी येथील केतन थोरवे हा खालापूरला जात होता. त्यावेळी पुढे असलेल्या डब्यातून एक ज्येष्ठ नागरिक घाईघाईने गाडीत चढण्याच्या नादात खाली कोसळले. क्षणाचाही विलंब न करता केतनने लोकलमधून फलाटावर उतरत त्या जेष्ठ नागरिकाला बाहेर खेचले आणि त्यांचे प्राण वाचविले. त्याच्या या प्रसंगावधानामुळे एका ज्येष्ठ नागरिक प्रवेशाचे प्राण वाचले.

## दुखवटा

### बळीराम राणे



**मोहोपाडा** : चौक मोर्बे येथील बळीराम राणे यांचे वृद्धत्वाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्ष होते. त्यांच्यावर मोर्बे गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. कै. बळीराम विठ्ठल राणे यांना सामाजिक कार्याची खूपच आवड होती. त्यांना परिसरातील नागरिक दादा म्हणून हाक मारायचे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. २) श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार आहे, तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि. ५) राहत्या घरी होणार आहे.

## पान १ वरून

### मी फिक्स मॅच पाहत नाही

आदित्य ठाकरे यांच्या एकट्या पर्यटन विभागाबाबत नाही, तर एकूणच महाविकास आघाडी सरकारचे समर्थन संपल्यानंतर ४०० जीआर काढण्यात आले आणि पाच पट पैसे वाटून टाकण्यात आले. बजेटचाही विचार करण्यात आला नाही. अशी प्रकारे काम सुरू ठेवले तर सरकारच्या तिजोरीवर त्याचा फार मोठा परिणाम होईल. त्याचा रिव्ह्यू केला जाईल, असा इशारा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

राज्यातील पावसाळी परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला आहे. त्यावर आधारित निर्णय आम्ही निश्चित घेऊ तसेच मागील सरकारने जो काही निर्णय घेतला होता त्यापेक्षा अधिक चांगला निर्णय आम्ही घेऊ, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### पनवेल उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय साहित्याचे उद्‍घाटन

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सर्वांनी एकत्र येऊन काम गरजेचे असून या रुग्णालयाला विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून पाठपुरावा करणार आहे तसेच सध्या रुग्णालयात डायलेसीसाठी एक टेक्निशियन आहे व अजून एक टेक्निशियन उपलब्ध झाल्यास काम दुप्पट वेगाने करता येईल. त्यामुळे जोपर्यंत अधिकृत टेक्निशियन उपलब्ध होत नाही तोपर्यंत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने टेक्निशियन उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर करून जे जे सहकार्य लागेल ते करू, असे आश्वासन दिले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. गणेश पांडुरंग मोरे** रा. गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**
**मौजे–तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२३ | २ | एकूण क्षेत्र ०–५३–८० पैकी श्री. गणेश पांडुरंग मोरे यांच्या मालकीचे क्षेत्र ०–३५–८० | ११.२४ / ७.४८ |

०–३५–८० (हे.आर.चौ.मी.) पैकी ०–१८–०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राबाबत

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २६/०७/२०२२**

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८९०८५५८२८९**

पत्ता :– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.




**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. २७ जुलै २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ पेंधर ■ रोहिंजण ■ मुर्बी ■ कोयनावेळे ■ पालेखुर्द ■ धामोळे

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000024121** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-37/2022-2023** RFx e-tender for Supply and replacement of 80mm & 100mm Radiator for 50MVA TF at 100kV Thal substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 11,44,250/-, EMD amount Rs. 11,443/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.07.2022, 18:00 Hrs. to 03.08.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.08.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.08.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

## भाजपचा केंद्रीय मंत्र्यांकडे पाठपुरावा
# एचआयएल कामगारांना मिळाला न्याय

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थान इन्सेक्टिसाईड लिमिटेड (एचआयएल) रसायनी या कंपनीतील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप नेते सुनील गोगटे यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे पाठपुरावा केला. त्यानुसार मंत्री महोदयांनी कंपनी व्यवस्थापनाला धारेवर धरत कामगार प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या मागण्या मान्य केल्या.

एचआयएल कंपनी कामगारांच्या सर्व सुविधा बंद करीत आहेत. याकामी केंद्र सरकारकडून न्याय मिळवून द्यावा, असे निवेदनवजा मागणी कामगारांच्या तीन युनियन्सने भाजप नेते सुनील गोगटे यांच्याकडे केली. गोगटे यांनी त्वरित लक्ष घालून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी संपर्क करून नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व रसायनमंत्री मन्सूख मांडवीया यांच्याकडे फेब्रुवारीमध्ये मीटिंग लावली. त्यात मंत्रीमहोदयांनी कंपनी बंद होऊ देणार नाही तसेच कामगारांच्या इतर समस्यासुद्धा दूर करू, असे आश्वासन दिले.

काही काळ व्यवस्थित गेला आणि पुन्हा जूनपासून टॉप मॅनेजमेंटने कामगारांना द्यायला पैसे नाहीत. इतर बस, कँटीन,





वैद्यकीय सुविधा बंद केल्या. तरी सर्व कामगार पगार न मिळतासुद्धा कंपनी चालू राहावी, कंपनीला फायदा व्हावा म्हणून काम करीत राहिले, पण मॅनेजमेंट अजिबात कामगारांना दाद देत नव्हती. म्हणून पुन्हा त्यांनी गोगटेंची भेट घेऊन दिल्ली येथे मंत्रीमहोदय, कंपनीचे अधिकारी आणि कामगार यांची जॉईंट मिटींग घ्यावी अशी विनंती केली. कामगारांच्या सांगण्यावरून गोगटे यांनी १० कामगार प्रतिनिधीना घेऊन दिल्ली येथे खासदार अनिल बोंडे यांची भेट घेऊन कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती केली. त्याचप्रमाणे ना. कपिल पाटील आणि ना. नारायण राणे यांनासुद्धा निवेदन दिले. खासदार बोंडे यांच्या पुढाकाराने मंत्री मांडवीया यांच्या दालनात खासदार बोंडे, गोगटे, मॅनेजिंग डायरेक्टर, कामगार यांची मीटिंग झाली. त्यात मंत्रीमहोदयांनी मॅनेजिंग डायरेक्टर यांना कामगारांसोबत चर्चा करून त्यांचा स्थानिक समस्यांचे समाधान त्वरित करून मला रिपोर्ट द्या, असा आदेश दिला.

बाकी कंपनीचा निर्णय आम्ही लवकरच करू, असे सांगितले. लगेच कामगारांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करून त्यांच्या १७ मागण्या मान्य करण्यात आल्या. त्याचे मिनिट्स बनवून मंत्रीमहोदयांना सादर केले गेले.

यामुळे सर्व कामगारांनी खूप आनंदित होत खासदार बोंडे, सुनील गोगटे यांच्यामुळे आमचे प्रश्न मार्गी लागले असल्याचे सांगितले. तसेच ना. कपिल पाटील, ना. नारायण राणे यांचेसुद्धा आभार मानले. याकामी वेळोवेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची मदत झाल्याचेही नमूद करण्यात आले. आता लवकरच कंपनी व्यवस्थित चालेल आणि शेकडो कामगारांची रोजीरोटी चालेल त्यामुळे कामगारांमध्ये आनंद दिसून आला. या वेळी युवा नेते अक्षय सर्वगोड, सर्वेश गोगटे आणि राहुल मसणे उपस्थित होते.

## महिला बचत गटामार्फत प्रेरणादायी काम करा –आमदार प्रशांत ठाकूर
### सुकापूर येथे रास्त भाव दुकानाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुमच्या कामाचे लोक उदाहरण देतील अशा स्वरुपाचे काम महिला बचत गटाच्या माध्यमातून काम करा, असे आवाहन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २५) रास्त भाव दुकानाच्या उद्घाटनावेळी केले. सुकापूर येथे जय अंबे महिला बचत गटाने सरकार मान्य रास्त भाव दुकान सुरू केले आहे. या दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या माध्यमातून देश प्रगतीच्या दिशेने जात आहे. नरेंद्र मोदी जे बोलतात ते करतात, त्यामुळे देशातील जनता त्यांच्या पाठीशी असून सर्व सामान्य जनतेचा विचार करणारा पंतप्रधान आपल्याला लाभला आहे. पुर्वी बोगस पद्धतीने रेशनच्या दुकानावर धान्य दिले जात होते. त्यामुळे ज्याला गरज होती त्याला याचा लाभ होत नव्हता, मात्र आत्ता बायोमॅट्रीक



आधारे नोंद करून धान्य दिले जात असल्याने तळागाळातील गरजूला याचा लाभ पोहचत आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या योजना सर्व नागरिकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत, तसेच त्यामुळे जय अंबे महिला बचत गटाचे दुकान हे केंद्र सरकार जी मदत करते ती मदत महिलांपर्यंत व त्यांच्या कुटूंबीयांपर्यंत पोहचवण्याचे केंद्र ठरेल यासाठी प्रयत्न करा.

उद्घाटनावेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच आळुराम केणी, दत्तात्रेय भगत, माजी सदस्य परशुराम पाटील, चाहु पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, प्राची जाधव, ज्येष्ठ नेते आत्माराम पाटील, हनुमंत खुंटले, आनंद म्हसकर, चांगदेव ठाकूर, डॉ. कृष्ण देसाई, भाजप पं. स. विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, सरचिटणीस उदय म्हसकर, गाव अध्यक्ष राजेश पाटील, जगन्नाथ पाटील, नारायण पाटील, चंद्रकांत पाटील, सचिन पाटील, सुरेश मुकादम, भाऊ पाटील, भरत म्हसकर, प्रमोद भगत, अमित पाटील, वासुदेव पाटील, जय अंबे महिला बचत गटाच्या अध्यक्ष संगीता पाटील, जनाबाई ठाकूर, खजिनदार मनीषा पाटील, निलेशा पाटील, वैशाली पाटील आदी उपस्थित होते.



**पनवेल : दहावी सीबीएसई परीक्षेत नवीन पनवेल येथील शांतिनिकेत पब्लिक संकुलमधील सिद्धी सतीश आहेर हिने ९८.८० टक्के गुण प्राप्त करून सुयश मिळवले आहे. तिच्या या यशाबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील, ॲड. अरुण पाटील, मुलीचे वडील सतीश आहेर उपस्थित होते.**

## आमदार महेश बालदी यांची यशस्वी मध्यस्थी
# जेएनपीएतील कंत्राटी कामगारांच्या पगारवाढीला मंजुरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या मध्यस्थीमुळे जेएनपीएच्या कंत्राटी कामगारांच्या पगारवाढीला मंजुरी मिळाली आहे. त्याबद्दल जेएनपीए प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

जेएनपीए बंदरात कंत्राटी पद्धतीने काम करीत असलेल्या ९५० कामगारांना गेली २७ महिने पगारवाढ न देणाऱ्या प्रशासनाच्या विरोधात जेएनपीए जनरल कामगार संघटनेने दंड थोपटताच



जेएनपीए प्रशासन हादरले. येत्या २९ जुलैला बंदची हाक दिली होती व हेकेखोर अधिकाऱ्यांना धडा शिकवण्याचा निर्धार केला होता. या वेळी युनियनचे सल्लागार आमदार महेश बालदी यांनीसुद्धा आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले होते. जेएनपीएचे चेअरमन संजीव सेठी व व्हाईस चेअरमन उन्मेष वाघ यांना चर्चेस बोलावून कामगारांच्या पगार वाढीच्या प्रस्तावाला मान्यता देत प्रस्तावावर सह्या केल्याने कंत्राटी कामगारांच्या पगारवाढीचा मार्ग मोकळा झाला आहे.

येत्या दोन दिवसांत पगारवाढीच्या करारावर सह्या करण्याचे निर्देश जेएनपीए उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे युनियनचे सल्लागार आमदार महेश बालदी यांच्यासमवेत कामगार नेते सुधीर घरत व सुरेश पाटील यांनी उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांची भेट घेऊन आभार मानले.

> **कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढीच्या प्रश्नावर दैनिक रामप्रहरने रोखठोक भूमिका बजावली. त्याबद्दल विशेष आभार.**
> **–सुधीर घरत, कामगार नेते**

## खांदा वसाहतीतील मलनिस्सारण वाहिन्या बदला –एकनाथ गायकवाड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा वसाहतीत मलनिस्सारण वाहिनीतील दूषित पाणी रस्त्यावर येत असल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नादुरुस्त मलनिस्सारण वाहिनी बदलण्याची मागणी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी सिडकोकडे केली आहे.

खांदा वसाहतीतील मान्सूनपूर्व गटारांच्या साफसफाईची कामे व्यवस्थित झाली नसल्याने अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचत आहे. शिवाय मलनिस्सारण वाहिनींमध्ये गाळ, कचरा जमा झाला असल्याने अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी आल्याने नागरिकांना चालणेही अवघड झाले आहे. नवीन पनवेलमधील मशीदसमोरील आणि एमटीएनएल कार्यालयासमोरील पंप हाऊस येथून नवीन पनवेल शहरातील सांडपाणी मलनिस्सारण वाहिनीतून सोडले जाते.

> **मलनिस्सारण वाहिनीची दुरुस्तीची कार्यवाही सुरू आहे. तसेच पंप दुरुस्तीसाठी इलेक्ट्रिक विभागाला सांगितले आहे. पावसाळ्यात पाण्यामुळे अनेकदा आरोग्याच्या तक्रारी निर्माण होत असतात. तरी नागरिकांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे.**
> **–बी. एन. रामोड,**
> **कार्यकारी अभियंता, सिडको**

खांदेश्वर मंदिराजवळ या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते, मात्र हे सांडपाणी पुढे वाहून न जाता उलट दिशेला येत असल्याने रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे खांदा वसाहतीमधील नादुरुस्त मलनिस्सारण वाहिनी आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे पंपांच्या दुरुस्तीची मागणी एकनाथ गायकवाड यांनी सिडकोकडे केली आहे.

## खारघरमधील सांडपाण्यासंदर्भात हर्षदा उपाध्याय यांचा पाठपुरावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यात खारघर परिसरातील रस्त्यावर मलनिस्सारण वाहिन्यांतील सांडपाणी येत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली असून नुकताच पालिका आणि सिडको अधिकाऱ्यांनी नागरिकांसोबत पाहणी केली आहे. यासंदर्भात माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय यांनी पाठपुरावा केला

खारघर सेक्टर ४, ५, ७, १२ व इतरही सेक्टरमध्ये पावसाळ्यात सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. उपाध्याय यांनी या समस्येबाबत पालिका आणि सिडको अधिकाऱ्यांनी पाहणी करून मलनिस्सारण वाहिन्यांच्या या समस्येतून सुटका करावी, अशी मागणी केली. त्यानुसार पालिकेचे

> **खारघर वसाहतीत विविध ठिकाणी सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. सिडकोने येरळा आयुर्वेदिक कॉलेजसमोरील स्कायवॉकखाली व सेक्टर ७ मधील नाल्यात सांडपाणी सोडले आहे. हे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात सोडण्यात यावे.**
> **–हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेविका**

> **खारघर वसाहतीत अनेक ठिकाणी रस्त्यावर सांडपाणी येत आहे. या परिसराचा सिडको कर्मचारी, माजी नगरसेवक आणि नागरिकांसमवेत पाहणी केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता गिरीष रघुवंशी यांच्याशी संपर्क साधून समस्या निदर्शनास आणून दिली आहे.**
> **–संजय जगताप, शहर अभियंता, पनवेल महापालिका**

शहर अभियंता संजय जगताप आणि सिडकोच्या खारघर कार्यालयाचे उपअभियंता अमित औटी यांच्यासह परिसरातील नागरिकांनी शहरातील विविध भागांची पाहणी केली.

सिडकोकडून रस्त्याचे डांबरीकरण करताना मॅनहोल झाकले गेल्याची बाब अधोरेखित करण्यात आली. तसेच मलनिस्सारण वाहिन्यांत अडकलेला कचरा, प्लास्टिक पिशवी बाहेर काढता येत नसल्याने सांडपाणी रस्त्यावर येत असल्याची बाब समोर आली. त्यामुळे सिडको अधिकाऱ्यांनी मलनिस्सारण वाहिन्यांच्या नकाशाचा शोध घेऊन रस्त्यावर येणाऱ्या सांडपाण्याची समस्या दूर केली जाणार आहे.

## नेत्रा पाटील यांच्या पुढाकाराने खारघरमध्ये बूस्टर डोस शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर आपल्या प्रभागातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी पनवेल महापालिकेतील भाजपच्या



माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील या कायम तत्पर असतात. रेजीन्सी क्रिस्ट, केसर गार्डन, जलवायू विहार सोसायटीतील शेकडो नागरिकांनी कोविड बुस्टर डोस घेतला. नेत्रा पाटील यांच्या पुढाकाराने शनिवार व रविवारी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून मोफत कोविड बूस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जलवायू विहार या सोसायटीत ज्यांनी देशसेवा केली असे सैन्यातील तिन्ही दलातील माजी सैनिक वास्तव्यास आहेत. देश सेवेतील या माजी सैनिकांसाठीदेखील विशेष लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस अनेक माजी सैनिकांनी नेत्रा किरण पाटील यांनी आपल्याच सोसायटीत कोविड लसचा बूस्टर डोस उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद दिले. कोविड व्हॅक्सीनेशन अमृत महोत्सवांतर्गत लस महोत्सव शिबिराचे आयोजन केल्याची माहिती नगरसेविका नेत्रा पाटील यांनी दिली दिली. खारघर येथील सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांनी या शिबिर आयोजनात विशेष योगदान दिले.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात कारगिल विजय दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २६) कारगिल विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कारगिल विजय दिवस म्हणून २६ जुलै हा भारतीय सैन्यासाठी शौर्याचा दिवस याच दिवशी कारगिल युध्दात भारताने आपला विजयाचा ध्वज फडकावला होता. हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. कारगिल विजय दिवस साजरा करण्याचे महत्त्व स्वप्ना भांडवलकर यांनी मुलांना भाषणाद्वारे सांगितले.

कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने झाली. सर्व शिक्षकांनी त्याचबरोबर सर्व विद्यार्थ्यांनी मेणबत्ती पेटवून कारगिल युध्दामध्ये शहिद



झालेल्या सैनिकांना अभिवादन केले. या कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रम व्यवस्थित व्हावा म्हणून सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहाकार्य लाभले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव श्री. गडदे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## उरण महाविद्यालयात कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने कर नियोजन व गुंतवणूक या विषयावर कर्मचारी विकास कार्यशाळा आयोजित केली गेली.

या कार्यषाळेत प्रमुख वक्ते व मागदर्षक म्हणून सीए. मयुर पवार हे होते. त्यांनी पगारी उत्पन्नावर करामध्ये मिळणारी सूट आणि विविध नियम याविशयी सविस्तर माहिती सांगितली, तसेच विविध प्रकारच्या गुंतवणूकीच्या माध्यामातून करात मिळवता येणारी सुट याविशयी मागदर्षन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अकाऊटंन्सी विभाग प्रमुख के. ए. षामा यांनी कराचे अचूक नियोजन करून योग्य गुंतवणूक केली पाहिजे असे सांगितले. सुत्रसंचालन प्रा. ए. के. गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्रा. शाम धारासूरकर यांनी, तर आभार प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी केले. कायशाळेचे आयोजन आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले. महाविद्यालयातील सर्व षिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीचा कार्यशाळेत सहभाग नोंदवला.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. निफ्टी प्राईव्हेट बँक निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या बँकेचा समावेश होत नाही?**
- ***अ.*** कोटक महिंद्र बँक
- ***आ.*** अक्सेस बँक
- ***इ.*** आयडीएफसीफस्ट बँक
- ***ई.*** युको बँक

**२. निफ्टी आयटी निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा समावेश होत नाही?**
- ***अ.*** एल अँड टी इन्फोटेक
- ***आ.*** माइंडट्री
- ***इ.*** आयटीसी
- ***ई.*** विप्रो

**३. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचे बाजारमूल्य सात लाख कोटींच्या वर नाही? (जुलै २०२२)**
- ***अ.*** रिलायन्स इंडस्ट्रीज
- ***आ.*** एलआयसी
- ***इ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस
- ***ई.*** एचडीएफसी बँक




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

***...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!***

# सावित्री नदी पुन्हा प्रदुषित

## पावसाचा फायदा घेत सांडपाणी सोडल्याचा अंदाज

**महाड : प्रतिनिधी**

शहराजवळून वाहणाऱ्या सावित्री नदीचे पाणी गेल्या दोन दिवसापासून काळे पडले असून, पावसाचा फायदा घेत औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांकडून रासायनीक सांडपाणी नदीत सोडले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. प्रदूषण मुक्तीची टिमकी वाजवणाऱ्या कारखानदारांकडूनच अशा प्रकारचे प्रदूषण केले जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



(छाया : महेश शिंदे)

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण काही केल्या थांबण्याची चिन्हे दिसत नसून, गेल्या दोन दिवसापासून महाडजवळून वाहणारी सावित्री नदी प्रदूषित झाली आहे. त्यामुळे गढूळ झालेले सावित्री नदीचे पाणी काळे झाल्याचे दिसून आले आहे. महाडपासून थेट खाडीपर्यंतचे पाणी प्रदूषित झाल्याने पावसाच्या पाण्याची संधी घेत औद्योगिक क्षेत्रातील कंपनी अगर सांडपाणी वाहतूक करणाऱ्या वाहनाने हे सांडपाणी सोडून दिले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दादली पुलाजवळ सावित्री नदीच्या पाण्यावर काळा तवंग निर्माण झाल्याचे नागरिकांनी पहिले. त्याबाबत महाडमधील सजग नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड कार्यालयाला कळवून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**सावित्री नदीचे पाणी काळे पडले असून पाण्याचे नमुने घेतले आहेत. प्रथमदर्शनी या पाण्यात घातक रासायनिक घटक आढळून येत नसले तरी पावसाचा फायदा घेत वाहनाने नदीपात्रात सांडपाणी सोडून देत येत असावे, असा अंदाज आहे.**

**–श्री. सोनावणे, क्षेत्र अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड**

# वारे स्मशानभूमीची दुरवस्था

## शेड मोजतेय अखेरची घटका; प्रशासनाचे दुर्लक्ष

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वारे येथे असलेल्या स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. दुरुस्ती अभावी स्मशानभूमी शेड अखेरची घटका मोजत आहे. या शेडची दुरुस्ती करावी आणि परिसरात वाढलेली झाडी–झुडपे काढून टाकूने स्मशानभूमीचे नुतनीकरण करावे अशी मागणी येथील ग्रामस्थ करीत आहेत.



(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्यातील वारे ग्रामस्थ तलावाच्या बाजूला असलेल्या खाजगी जागेत मृत व्यक्तीवर अंत्यविधी करत असत. ग्रामपंचायतीचे तत्कालीन उपसरपंच स्व. प्रवीण म्हसे यांच्या प्रयत्नाने तलावाशेजारीच पक्की स्मशानभूमी बांधण्यात आली, मात्र त्या ठिकाणी उभारलेल्या शेडची अनेक वर्षे देखभाल आणि दुरुस्ती करण्यात आलेली नाही. या शेडवरील पत्रे जळाले असून, लाकडे रचण्याच्या जागेवर मोठा खड्डा पडला आहे. स्मशानभूमीवरील शेडचे पत्रे जाळल्याने पावसाळ्यात मृतदेहावर ताडपत्री धरावी लागत आहे. तर उन्हाळ्यात ग्रामस्थांना भर उन्हामध्ये थांबावे लागते. काही दिवसांपूर्वीच पंचायत समितीचे माजी सभापती दत्तात्रेय म्हसे यांचे निधन झाले. पाऊस पडत असल्याने ग्रामस्थांना ताडपत्रीच्या आधाराने त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागले होते. विशेष म्हणजे पावसाळ्यात शेड अभावी लाकडे ओली राहिल्यामुळे मृतदेहाची विटंबना होत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

संबंधित प्रशासनाने वारे स्मशानभूमीची योग्य देखभाल, दुरुस्ती करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थ करत आहेत.

**वारे येथील स्मशानभूमी शेडची ग्रामपंचायत प्रशासनाने वेळोवेळी दुरुस्ती केली आहे. तरीही चितेच्या ज्वाळांनी छताचे पत्रे निकामी होत आहेत. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून पूर्णपणे आरसीसी बांधकाम असलेली चांगल्या दर्जाची स्मशानभूमी बांधण्यासाठी प्रयत्न केले जातील.**

**–योगेश राणे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वारे, ता. कर्जत**

# पेणच्या आई डे केअर संस्थेचे दिव्यांग विद्यार्थी राख्या बनविण्यात मग्न

## भारतीय सैनिकांना पाठविल्या राख्या



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

आई डे केअर ही रामवाडी पेण येथे मतिमंद मुलांसाठी शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण देणारी संस्था असून, संस्थेच्या २२ विद्यार्थ्यांनी या वर्षी १५प्रकारच्या साडेचार हजार राख्या विक्रीसाठी तयार केल्या आहेत. त्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा प्रेमलता पाटील, उपाध्यक्ष डॉ. शिल्पा ठाकूर, उपमुख्याध्यापिका विद्या खराडे, विशेष शिक्षिका शिल्पा पाटील, सहकारी ज्योती मॅडम, निशा पाटील, अक्षता देवळे, मनोज मेस्त्री यांची विशेष मेहनत दिसून येते.

नवी मुंबई, पनवेल येथे राख्याविक्रीचे स्टॉल्स लावण्यात समाजसेवी संस्थांनी मदत केली. आई डे केअर संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या एक हजार पाचशे राख्या जन शिक्षण संस्थान–रायगड आणि इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांनी खरेदी केल्या असून, त्या सैनिक बांधवांकडे रवाना झाल्या आहेत. काही हितचिंतकांनी या विशेष मुलांच्या मेहनतीतून साकारलेल्या राख्या इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये पाठविल्या असल्याची माहिती संस्थेच्या संस्थापक स्वाती मोहिते यांनी दिली.

राख्या विक्रीतून येणारे उत्पन्न संस्था विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करते. त्यामुळे या विशेष मुलांना स्वावलंबी झाल्याचा आनंद मिळतो.

# मुरूड नगर परिषदेची उद्या आरक्षण सोडत

**मुरूड : प्रतिनिधी**

नगर परिषदेची आरक्षण सोडत गुरुवारी (दि. २८) सायंकाळी ४ वाजता काढण्यात येणार असून, त्यावेळी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.

सुप्रीम कोर्टाने बांठिया आयोगाचा अहवाल मान्य केला असून, या अहवालानुसार निवडणुका घेण्याचे निर्देश दिल्याने निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरू केली आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार गुरुवारी सायंकाळी चार वाजता मुरूड नगर परिषदेच्या कै.नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात नगरसेवक पदांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. नागरिकांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविण्याकरिता २९ जुलै रोजी या आरक्षण सोडतीची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

दरम्यान, आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना असल्यास त्या नागरिकांनी १ ऑगस्ट सायंकाळी ६ वाजेपर्यंत नगर परिषद मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याकडे सादर करावयाच्या आहेत, असे निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पर्जन्यनोंदीत जिल्ह्यात माथेरान अव्वल

## पावसाने पार केला तीन हजार मिलिमीटरचा टप्पा

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमध्ये आतापर्यंत एकूण ३०७८ मिमीपेक्षा जास्त पाऊस झाला असून, पर्जन्यमानात रायगड जिल्ह्यात माथेरान प्रथम क्रमांकावर आहे, तर कर्जत दुसऱ्या आणि खालापूर तिसऱ्या स्थानावर आहे.

हिरवीगार झाडी, दाट धुके, हुडहुडी भरविणारी थंडी आणि पावसाच्या दमदार सरी असे आल्हाददायक वातावरण सध्या माथेरानमध्ये पाहायला मिळत आहे. या वर्षीची माथेरानमधील एका दिवसाची म्हणजेच २४ तासांतील, सर्वाधिक पर्जन्यनोंद १५ जुलैला ३५४.२० मिमी इतकी नोंदविण्यात आली. माथेरानमध्ये संपूर्ण जून महिन्यात एकूण ४२६.१० मिमी तर २६ जुलै महिन्यात (दि. २६ पर्यंत) एकूण ३०७८ मिमी पावसाची नोंद झाली असल्याची माहिती पर्जन्यमापक निरीक्षक अन्सार अन्वर महापुळे यांनी दिली.

# कारगिल विजय दिनानिमित्त वीर यशवंत घाडगेंना अभिवादन

## माणगाव पोलिसांतर्फे वृक्षारोपण

**माणगाव : प्रतिनिधी**

कारगिल विजय दिनानिमित्त माणगाव पोलीस ठाण्यातर्फे मंगळवारी (दि.२६) माजी सैनिकांच्या हस्ते व्हिक्टोरिया क्रॉस प्राप्त वीर यशवंत घाडगे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी वृक्षारोपणही करण्यात आले.



(छाया : सलीम शेख)

माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्यासह माजी सैनिक, पोलीस कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नमुना–१

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

क्र. उविअमा/भूसं/कात–२/घोटवळ/एस आर –१४१/२०१७
उपविभागीय अधिकारी माणगाव,रायगड यांचे कार्यालय
दिनांक : २२/०७/२०२२

ज्या अर्थी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग रायगड यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.मृद व ज.सं.वि/रायगड/प्रशा–३७/सन २०२२/दिनांक २१/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडे मौजे घोटवळ धरणासाठी क्षेत्र १५–१४–३० हे.आर क्षेत्राचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्या अर्थी मा.जिल्हाधिकारी, रायगड–अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक/टे–६/३५८०४/मौजे घोटवळ/२०२२ दि.११/०७/२०२२ अन्वये घोटवळ लघु पाटबंधारे योजना धरणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या कामी महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व शासन परिपत्रक /क्र.एलक्युएन–०१/२०१७/प्र.क्र.१२/अ–२/दिनांक २५/०१/२०१७ अन्वये मौजे घोटवळ, ता.माणगांव येथील क्षेत्र १५.१४.३० हेक्टर आर जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला असून त्यामध्ये उपविभागीय अधिकारी माणगांव यांना प्राधिकृत केलेले आहे.

मा.जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील वरील प्राप्त प्रस्तावानुसार घोटवळ गावाचे धरण या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. संकीर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ–२,दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेबर, २०१५ व शासन महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने जमीन संपादनाकामी संपादीत करण्यात येत आहेत.

यापुर्वी संपादीत होणारे १५–१४–३० हे.आर क्षेत्राची नमुना–१ ची खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबतची जाहीर नोटीस स.नं./गट नंबर निहाय दिनांक २४/०६/२०२२ रोजी दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.सदरची प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आली असून नव्याने त्याच क्षेत्राची १५–१४–३० हे.आर क्षेत्राची नमुना– १ ची जाहीर नोटीस प्रसिध्दीसाठी देण्यात येत आहे.

त्या अर्थी, आता

५. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी, श्रीम.प्रशाली जाधव–दिघावकर, उपविभागीय अधिकारी माणगांव याद्वारे,

(एक) अनुसूची–१ मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने जिल्हा संधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,कळवा ठाणे यांच्या नावे घेण्याबाबत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहे; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयूल–१ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चीत करण्यात येईल.

(तीन) संबंधीत भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे जिल्हा संधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,कळवा ठाणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

६. संबंधित भूधारकांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी, माणगांव यांच्याकडे दाखल करावीत.

७. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी माणगांव यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपविभागीय अधिकारी माणगांव यांच्या कार्यालयामध्ये व महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवणेत आली आहे.

**अनुसूची – एक**

**खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशिल**

**गावाचे नाव – घोटवळ    तालुका : माणगांव    जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | एकूण ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे. आर.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| १ | ८१ | ०.०४.०० | ०.०४.०० |
| २ | १६६ पै. | १.७२.०० | ०.६५.०० |
| ३ | १६९ पै | ०.२६.५० | ०.०८.०० |
| ४ | १७० | ०.५१.०० | ०.५१.०० |
| ५ | १७१ पै. | १.००.०० | ०.७०.०० |
| ६ | १७२ | ०.३६.०० | ०.३६.०० |
| ७ | १७३ | ०.११.१० | ०.११.१० |
| ८ | १७४ | ०.४६.६० | ०.४६.६० |
| ९ | १७५ | ०.७५.९० | ०.७५.९० |
| १० | १७६ | ०.४४.७० | ०.४४.७० |
| ११ | १७७ | ०.७३.२० | ०.७३.२० |
| १२ | १७८ | ०.१८.०० | ०.१८.०० |
| १३ | १७९ | ०.९२.०० | ०.९२.०० |
| १४ | १८१ | ०.०८.०० | ०.०८.०० |
| १५ | १८२ | ०.११.०० | ०.११.०० |
| १६ | १८३ | ०.०५.०० | ०.०५.०० |
| १७ | १८४ | ०.९४.०० | ०.०५.०० |
| १८ | १८५ | ०.२४.०० | ०.२४.०० |
| १९ | १८६ | १.०१.०० | १.०१.०० |
| २० | १८७ | ०.०६.३० | ०.०६.३० |
| २१ | १८८ | ०.१८.०० | ०.१८.०० |
| २२ | १८९ | ०.०६.३० | ०.०६.३० |
| २३ | १९० | १.००.०० | १.००.०० |
| २४ | १९१ | ०.१८.२० | ०.१८.२० |
| २५ | १९२ पै. | ३.२०.०० | २.६५.०० |
| २६ | १९३ | ०.१९.०० | ०.१९.०० |
| २७ | १९४ | ०.६८.०० | ०.६८.०० |
| २८ | १९५ पै. | २.१२.०० | १.०५.०० |
| २९ | १९६ पै. | ०.८१.०० | ०.२१.०० |
| ३० | २३६ पै. | १.०७.०० | ०.४५.०० |
| ३१ | २३७ पै. | ०.६८.५० | ०.४५.०० |
| ३२ | २३८ | ०.६८.५० | ०.१०.०० |
| ३३ | २३९ पै. | १.४३.०० | ०.२२.०० |
| ३४ | २४४ | ०.१६.०० | ०.१६.०० |
| | **एकूण** | **२२.४५.८०** | **१५.१४.३०** |

दिनांक:– २२/०७/२०२२
ठिकाण : माणगांव

**सही/–**
**(प्रशाली जाधव–दिघावकर)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव विभाग माणगांव**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/८१/१३४४/२०२२**

# साथीच्या आजारांबाबत नवी मुंबई पालिका सज्ज


## वाशी रुग्णालयात डेंग्यू, मलेरियासाठी स्वतंत्र कक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वाशी रुग्णालयात मलेरिया व डेंग्यू रुग्णांवरील उपचारांकरिता वेगळा कक्ष स्थापन करण्यात येणार आहे तसेच डेंग्यूच्या आजारामध्ये प्लेटलेट्सची रुग्णांना भासणारी गरज महापालिकेमार्फत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. प्लेटलेट्सकरिता आवश्यक असणारी मशीन महानगरपालिकेची स्वतःची असावी, असे आदेश आयुक्त अभिजित बांगर यांनी दिले. वाढत्या डेंग्यू, मलेरिया व स्वाईन फ्ल्यूच्या साथीवर पालिका आयुक्तांनी विशेष बैठक घेतली.

साचलेल्या पाण्यात डास अंडी घालत असल्याने हा काळ डास उत्पत्तीच्या दृष्टीने जोखमीचा आहे हे लक्षात घेऊन डास उत्पत्ती स्थानांचा शोध घेणे व ती नष्ट करणे या मोहिमा अधिक काळजीपूर्वक व तीव्रतेने राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी आरोग्य विभागास दिले.

या वेळी मलेरिया व डेंग्यूच्या प्रार्दुभावाचा सविस्तर आढावा घेताना आयुक्तांनी ज्या परिसरात रुग्ण आढळले आहेत, अशी नागरी आरोग्य केंद्रनिहाय विभागणी करावी व त्यानुसार कृती आराखडा तयार करावा असे निर्देश दिले. त्याचप्रमाणे नागरी आरोग्य केंद्राच्या स्तरावरही कोणत्या भागात रुग्ण आढळताहेत त्या भागाकडे जास्त लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देशित केले.



मागील दोन वर्षांतील आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करून त्या भागांकडे विशेष लक्ष देण्याचे सूचित करतानाच बांधकाम साईट्स या डास उत्पत्तीच्या दृष्टीने जोखमीच्या आहेत. त्याकडे अधिक काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. डास उत्पत्ती स्थाने शोध मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे असे निर्देश त्यांनी दिले. संबंधीत नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी डास उत्पत्ती स्थाने शोध मोहिम तसेच धुरीकरण कार्यवाहीवर बारकाईने लक्ष द्यावे व या यंत्रणेवर संपूर्ण नियंत्रण ठेवावे, अशाही सूचना आयुक्तांनी केल्या.

बरेचदा मोठ्या सोसायट्यांमधून डास उत्पत्ती स्थाने शोधासाठी येणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना प्रतिबंध केला जातो. या अनुषंगाने शोध मोहिमेसाठी सोसायट्यांमध्ये जाण्यापूर्वी तेथील अध्यक्ष अथवा सचिव यांना कळवून जावे व जाताना शोध पथकामध्ये शक्यतो एक तरी महिला कर्मचारी असावी अशा सूचना आयुक्तांनी दिल्या, मात्र प्रवेश नाकारणाऱ्या सोसायट्यांवर सामाजिक आरोग्यविषयक कार्यवाहीला बाधा आणल्याने दंडात्मक कारवाई करण्यात यावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

**स्वाईन फ्लूबाबत अधिक खबरदारी**

*डेंग्यू व मलेरिया प्रमाणेच स्वाईन फ्लूचे रुग्णही आढळत असून त्याबाबत अधिक खबरदारी घेण्याचे निर्देशित करतानाच स्वाईन फ्ल्यूच्या लक्षणांविषयी तसेच तो होऊ नये म्हणून घ्यावयाच्या खबरदारीविषयी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी. त्याचप्रमाणे खाजगी व्यावसायिकांनाही त्याबाबत अवगत करावे, असेही आयुक्तांनी सूचित केले.*

# रसायनामुळे भेंडखळ खाडीतील मासे मृत

**उरण : वार्ताहर, बातमीदार, प्रतिनिधी**





उरण तालुक्यातील भेंडखळ येथे रासायनिक पाणी खाडीमध्ये सोडल्यामुळे मासळी मेलेली आढळून आली. यामुळे सर्व ग्रामस्थांमध्ये रोष पसरला आहे.

उरण तालुक्यातील भेंडखळ गावानजीक असलेल्या खाडीत रात्री अज्ञात व्यक्तीने रासायनिक पाणी टँकरद्वारे खाडीच्या पाणीत सोडले आहे. त्यामुळे सर्व मासे, जलचर प्राणी मृत्युमुखी पडले आहेत. यामुळे भेंडखळ ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे. गेल्या अनेक दिवसा पासून असे प्रकार सुरू आहेत. या अगोदरसुद्धा अशा घटना घडलेल्या आहेत. अशा घटना वारंवार का घडतात? मागील काही दिवसांपासून अशा घटना घडूनदेखील अज्ञात व्यक्तीवर का कारवाई होत नाही? पोलीस प्रशासन अशा घटना का रोखू शकत नाही असे सवाल भेंडखळमधील ग्रामस्थांनी उपस्थित केले आहेत.

बाहेरील वाहने अंधाराचा फायदा घेत अर्ध्या रात्री अशा केमिकल युक्त रसायनांचा साठा गुपचूपपणे खाडीमध्ये सोडतात अशाने पाण्यातील मासे, खेकडे, समुद्री साप, कासव आदी प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. तर अनेक मासे प्राणी मृत्युमुखी पडतात. आणी हीच मासे स्थानिक नागरीकांनी खाल्ली तर त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर झाला तर त्याला जबाबदार कोण, असा सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. प्रशासनाने या गोष्टीची खोलवर दखल घ्यावी व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी; अन्यथा अशा घटना होताना दिसल्यास ग्रामस्थ त्या व्यक्तींना चांगलाच चोप देतील, असेही येथील ग्रामस्थांनी सांगितले.

# ‘जेएनपीए’चा बँक ऑफ बडोदासोबत करार

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएने भारतातील आघाडीच्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या बँक ऑफ बडोदा सोबत एका करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारांतर्गत बँक ऑफ बडोदाद्वारा जेएनपीए बंदर प्राधिकरणास डिजीनेक्स्ट कॅश मॅनेजमेंट सेवा प्रदान केली जाईल आणि बंदर प्राधिकरणाची देयके, संकलन आणि लिक्विडिटी व्यवस्थापनचे डिजिटायझेशन केले जाईल.



जेएनपीएला डिजिटल परिवर्तनाचे संपूर्ण फायदे प्राप्त करून देण्यास मदत करण्यासाठी बँक ऑफ बडोदाने बडोदा डिजिनेक्स्टचे सॅप प्रणालीसोबत यशस्वीरित्या इंटीग्रेशन केले आहे. पहिल्या टप्प्यात, यामुळेजेएनपीएला आपल्या देय खात्यांचे डिजिटायझेशन आणि स्वयंचलित करण्यात मदत होईल. सर्व पेमेंटची स्थिती जेएनपीएच्या ईआरपी सिस्टीममध्ये अद्ययावत केली जाईल, पेमेंट सल्ला आणि एसएमएस अलर्ट बडोदा डिजीनेक्स्टद्वारे थेट पेमेंटच्या लाभार्थ्यांना पाठवले जातील.

या नवीन सेवेबाबत जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, जेएनपीएमध्ये स्थापित केलेल्या सॅपप्रणालीचे उद्दिष्ट सर्व व्यावसायिक व्यवहारांच्या जलद अंमलबजावणीसाठी व्यवसायातील नवनवीन शोधांना चालना देणे आहे. यामध्ये आणखी वाढ करण्यासाठी व जेएनपीएचे डिजिटायझेशन एका व्यापक स्तरावर नेण्यासाठी तसेच जेएनपीएचा व्यवसाय अधिक संघटित, स्वयंचलित आणि कार्यक्षम बनवण्यासाठी आम्ही बँक ऑफ बडोदाशी त्यांच्या ’बडोदा डिजिनेक्स्ट कॅश मॅनेजमेंट सर्व्हिसेस’चा लाभ घेण्यासाठी एक करार केला आहे.

# छत्रपती शिवरायांचा अवमान सहन करणार नाही

## सकल मराठा समाजातर्फे पनवेल प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

तिरुपती बालाजीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांची प्रतिमा असलेली वाहने अडविल्याची व्हिडीओ व्हायरल होत आहेत. यापार्श्वभूमीवर सकल मराठा समाजातर्फे छत्रपती शिवरायांचा अवमान सहन करणार नाही, अशी भूमिका मांडत पनवेल प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.



तिरुपती बालाजी या ठिकाणी महाराष्ट्रातील अनेक भाविक दर्शनासाठी जातात. त्यापैकी बहुतांशी जण आपल्या स्वतःच्या वाहनाने तिरुपतीला जातात. महाराष्ट्राचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा अनेक वाहनांमध्ये असते, परंतु छत्रपतींची प्रतिमा मूर्ती त्याचबरोबर भगवा झेंडा असलेल्या वाहनांना त्याठिकाणी अडवले जाते. पुढे प्रवेश करून दिला जात नाही. अशाप्रकारे अनेक भाविकांच्या तक्रारी आहेत. यासंदर्भात समाज माध्यमांवरसुद्धा काही भाविकांनी वस्तुस्थितीदर्शक व्हिडिओ व्हायरल केले आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा हा एक प्रकारे अवमान आहे. संबंधित देवस्थानला विचारणा करावी. त्याचबरोबर आंध्र प्रदेश राज्य सरकारशी संपर्क साधून या प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी. तसेच केंद्र सरकारशी समन्वय साधून महाराजांची प्रतिमा असलेल्या वाहनांची अडवणूक होऊ नये यासंदर्भात उपाययोजना करण्यात याव्यात, अशी न्याय्य मागणी पनवेल चे प्रांताधिकारी राहुल मुंडके यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

या वेळी सकल मराठा समाज, कळंबोली तर्फे समाज बांधव रामदास शेवाळे, प्रकाश चांदीवडे, गणेश लाड, संतोष गायकवाड, किरण नागरगोजे, महादेव क्षीरसागर, सागर मोरे व अवधूत साळुंखे उपस्थित होते.

# भाज्यांनी ओलांडली शंभरी!

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाजीपाल्याची आवक वाढली असली तरी बाजारभाव गगनाला भिडू लागले आहेत. जवळपास सर्वच भाज्यांनी शंभरी ओलांडली आहे. वाटाणा १४० ते १६० रुपये किलो व गवार १०० ते १६० रुपये किलो दराने विकली जात असून एक जुडी पालेभाजीसाठी २५ रुपये मोजावे लागत आहेत.



बाजार समितीमध्ये सोमवारी ६५१ वाहनांमधून २६ हजार टन भाजीपाल्याची आवक झाली आहे. यामध्ये ४ लाख ६४ हजार जुडी पालेभाज्यांचाही समावेश आहे. आठवड्याच्या पहिल्या दिवशी साधारणतः तीन हजार टन कृषिमालाची व ५ ते ७ लाख जुडी पालेभाज्यांची विक्री होत असते. आवक कमी झाली असल्यामुळे भाज्यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भेंडी, गवार, घेवडा, ढोबळी मिरची, राजमा, तोंडली, दुधी या भाज्यांचे दर प्रतिकिलो शंभरपेक्षा जास्त झाले आहेत.

### गवार, वाटाणा १६० रुपयांवर

कोथिंबिरीसह पालेभाज्यांचेही दर वाढले आहेत. सर्वच भाज्यांचे दर वाढत असताना टोमॅटोने मात्र ग्राहकांना दिलासा दिला आहे. होलसेल मार्केटमध्ये टोमॅटो १६ ते २२ रुपये किलो दराने विकला जात असून किरकोळ मार्केटमध्ये टोमॅटो ३० ते ४० रुपये किलो दराने विकला जात आहे.

**पावसामुळे उत्पादनावर परिणाम झाला असल्यामुळे बाजार समितीमध्ये आवक कमी होत आहे. आवक कमी असल्यामुळे बाजारभाव वाढू लागले आहेत. इतर भाज्यांचे दर वाढत असताना टोमॅटोचे दर नियंत्रणात आहेत.**
**-स्वप्नील घाग, भाजीपाला विक्रेता**

# कांदा, बटाटा, लसणाचे दर नियंत्रणात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा, बटाटा, लसणाची आवक वाढल्याने सध्या दर नियंत्रणात आहेत. घाऊक बाजारात कांदा ९ ते १६ रुपये किलो असून बटाटा १४ ते १९ रुपये किलो आहे; तर लसनाचे दर ८ ते ४० रुपये किलो आहेत. कांद्याचे दर हे सप्टेंबर महिन्यापर्यंत स्थिर राहतील. त्यानंतर जुना कांदा संपुष्टात आल्यानंतर दर वाढण्याची शक्यता असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

**घाऊक दर**

| | २५ जुलै | २५ जून |
|---|---|---|
| कांदा | ९ ते १६ | ६ ते ११ |
| बटाटा | १४ ते १९ | १२ ते १७ |
| लसूण | ८ ते ४० | ७ ते ३० |

सध्या बाजारात पुणे व नाशिक जिल्ह्यामधून दररोज ८० ते ८५ गाड्या कांद्याची आवक होत आहे. बटाट्याचे भावही स्थिर असून १४ ते १९ रुपये किलो दर आहे. बाजारात बटाट्याच्या ३५ ते ४० गाड्यांची आवक होत आहे. सद्यस्थितीत गुजरात व उत्तर प्रदेशातून बटाटा मोठ्या प्रमाणात येत आहे.



घाऊक बाजारात लसूण ८ ते ४० रुपये किलोने असून इंदोर व गुजरातमधून बाजारात आवक सुरू आहे. दोन महिन्यांच्या तुलनेत कांद्याचे दर चार रुपयांनी वाढले आहेत, तर बटाट्याचा दर दोन रुपयांनी वाढला आहे. लसनाच्या दरातही किंचित वाढ झाली असली तरी हे दर स्थिर असल्याचे एपीएमसीतील व्यापारी अशोक वाळुंज यांनी बोलताना सांगितले.

# वाशी गावात तरुणीचा विनयभंग

## अज्ञातावर गुन्हा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी गावातील एका अल्पवयीन मुलीसोबत २० ते २५ वयोगटातील एका अज्ञात तरुणाने अश्लील चाळे केल्याची घटना रविवारी (दि. २४) दुपारी घडली होती. या प्रकरणी विनयभंगासह पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अज्ञात तरुणाचा शोध घेत आहेत.

पीडित मुलगी रविवारी दुपारी २च्या सुमारास दुकानातून दूध आणण्यासाठी घराबाहेर पडली होती. या वेळी २० ते २५ वयोगटातील एका अज्ञात तरुणाने पीडिताला बोलावून घेऊन बाजूच्या इमारतीमध्ये नेले. त्यानंतर त्याने पीडितेसोबत अश्लील चाळे केले होते. या प्रकारानंतर घाबरलेल्या पीडित मुलीने घडल्या प्रकाराची माहिती आई-वडिलांना दिली. त्यांनी त्या तरुणाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सापडला नसल्याने अखेर पीडित मुलीच्या पालकांनी वाशी पोलीस ठाण्यात या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

# सतीश वैरागी कोकण अध्यक्षपदी

**पनवेल :** येथील सतीश भालचंद्र वैरागी यांची ओबीसी हक्क परिषद दिल्लीच्या कोकण विभाग अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ओबीसी हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप बाबुराव फाले यांनी केली असून नियुक्ती झाल्याबद्दल वैरागी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



ओबीसी नेते विजय चौधरी, प्रदेशाध्यक्ष कैलास सोनवणे, राष्ट्रीय महासचिव रंगनाथ गुरव, राष्ट्रीय महिला अध्यक्ष सुषमा मुंडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेश घोरपडे, रंजना विश्वनाथ पवार, सुभाष पांचाळ, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश परिहार आदींनी वैरागी यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# सकल मराठा समाजातर्फे विद्यार्थी करिअर मार्गदर्शन आणि गुणगौरव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील सकल मराठा समाज चावणे विभागाचे अध्यक्ष महादेव कचरे, सचिव योगेश पाटील व उपाध्यक्ष अनंता मोरे यांच्यावतीने परिसरातील दहावी, बारावी व पदवीधर विद्यार्थ्यांचा गुणगौरव व करीअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सकल मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक विनोद साबळे उपस्थित होते.



या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना डॉ. प्रतिभा महिंद्रकर, शिक्षिका अमृता पाटील, प्रताप नारकर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी करिअर मार्गदर्शन करताना मोबाइलचा वापर कमी करावा, अडचणीत अनुभवी माणसाचा सल्ला घ्यावा. आर्टस, कॉमर्स, सायन्स कोणत्याही साईटने शिक्षण घेणे कमी नाही, कुठूनही करीअर होते असे मार्गदर्शकांनी बोलताना सांगितले.

या वेळी परिसरातील शाळांत दहावी, बारावी व पदवीधर यांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सरपंच भारती चितळे, सरपंच रिया कोंडीलकर, तानाजी पाटील, हभप मारुती महाराज पाटील, हभप श्रीकांत पाटील, ॲड. संजय टेंबे, शंकर गोडीवले, गणेश भोईर, दीपक देशमुख, वामन पाटील, गणेश पवार, संदिप गोडीवले, बाळा महाडिक, हरीदास पाटील, मनोज पाटील, अंकूश भौड, चंद्रकांत पाटील, बाबू कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष महादेव कचरे, उपाध्यक्ष अनंता मोरे, सचिव योगेश पाटील यांनी परिश्रम घेतले.




# नावंढे-डोळवली रस्त्याची दुरवस्था

## दुरुस्तीसाठी ग्रामस्थ आक्रमक, स्वातंत्र्यदिनी उपोषण करण्याचा इशारा

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील घोडीवली फाटा मार्गे नावंढे-डोळवली रस्ता खड्ड्याच्या विळख्यात सापडला असून, या मार्गावरील काही मोऱ्यांना भगदाड पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर लहान-मोठे अपघात घडत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करावी, या मागणीचे निवेदन मंगळवारी (दि. २६) पंचक्रोशीतील सर्वपक्षीय नेते व ग्रामस्थांनी खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांना दिले. दरम्यान, या रस्त्याचे काम त्वरित सुरू न केल्यास स्वातंत्र्यदिनी उपोषण करण्याचा इशारा भाजप नेते निवृत्ती पिंगळे यांनी या वेळी दिला.



खालापूर तालुक्यातील घोडीवली फाटामार्गे नावंढे-केळवली-वणी-बीड-जांबरुंग-खरवई-डोळवली या रस्त्याची पावसाळ्यात अत्यंत बिकट आवस्था झाली असून, अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डेचखड्डे पडले असून, त्यांना आताच्या घडीला डबक्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मात्र त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. पंचक्रोशीतील सर्व पक्षीय नेते व ग्रामस्थांनी एकत्र येत मंगळवारी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना निवेदन दिले. त्यात या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या वेळी खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला आणि खालापूर पोलीस ठाणे यांनाही निवेदन देण्यात आले. या वेळी भाजपचे निवृत्ती पिंगळे, राष्ट्रवादीचे हनुमंत पिंगळे, शेखर पिंगळे, अ‍ॅड. राजेंद्र येरुणकर, युवासेनेच प्रशांत खांडेकर, खालापूर पं.स. चे माजी सदस्य अक्षय पिंगळे, मनसे सचिन कर्णुक, शिवसेनेचे रोहिदास पिंगळे, सामाजिक कार्यकर्ते अरुण नलावडे, समाधान दिसले, किरण हाडप, नवज्योत पिंगळे, सागर पिंगळे, ज्ञानेश्वर पिंगळे, गौरव दिसले, अजय पिंगळे, सुधीर पिंगळे, राकेश फराड, समीर हाडप यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

**नावंढे-डोळवली या रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य झाले असून, मोऱ्यांना भगदाड पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर दररोज अपघात होत आहेत. या रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती न झाल्यास स्वातंत्र्यदिनी खालापूर तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल.**

**-निवृत्ती पिंगळे, भाजप नेते, खालापूर**

## नागोठणे पाणीपुरवठ्याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीसांना साकडे

### आमदार प्रवीण दरेकर व चंद्रकांत पाटील यांनाही भाजपचे सचिन मोदी यांचे निवेदन



(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे शहर व परिसरात सुरळीत व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नाही. भाजपचे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी आमदार रविशेठ पाटील व युवानेते वैकुंठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच पनवेल येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली व त्यांना नागोठण्याला होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत माहिती आणि लेखी निवेदन दिले.

सचिन मोदी यांनी या वेळी माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनाही नागोठण्याच्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत लेखी निवेदन दिले. नागोठणे गावाचा पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर सोडवला जाईल, असे आश्वासन प्रवीण दरेकर यांनी या वेळी दिले.

## सुधागडातील पोटलज फाटा येथे रिक्षावाल्याला मारहाण करून लुटले

### चारही आरोपींना पोलिसांनी शिताफीने पकडले

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पोटलज फाटा येथे एका रिक्षाचालकाला चार जणांनी मारहाण करून लुटल्याची घटना घडली होती. या गुन्ह्यातील चारही जणांना पाली पोलिसांनी पकडले असून, त्यातील दोनजण अल्पवयीन असल्याने कर्जत बालसुधारगृहात आहेत. तर दोनजण अलिबाग कारागृहात आहेत.

रिक्षा चालक प्रमोद गुजर (वय ३९) हे रविवारी (दि. १७) रात्री खोपोली येथून आपली रिक्षा चालवित बहिरीचीवाडी (भिरा) येथे जात होते. ते पाली-नांदगाव रस्त्यावरील पोटलज फाटा येथे आले असता चार अज्ञात इसमांनी त्यांची रिक्षा अडवली आणि प्रमोद गुजर यांना मारहाण करून त्यांच्या खिशातील तीन हजार रुपये व दहा हजार रुपये किमतीचा मोबाइल घेऊन पसार झाले.

या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक तृप्ती बोराटे, हेडकॉन्स्टेबल महेश लांगी, कॉन्स्टेबल विकास राठोड व चंदनशिवे, पोलीस नाईक धर्मेंद्र म्हात्रे, शेडगे व घासे यांच्या पोलीस पथकाने तपास करून दोघांना लगेच अटक केली. आणि दुसऱ्या दिवशी दोघांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून पैसे व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक तृप्ती बोराटे करीत आहेत.

## धिंगाणा घालणाऱ्या पर्यटकांवर पोलिसांची नजर

### पेण कासमाळ येथे वाहनांची तपासणी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील कासमाळ या पर्यटन स्थळावर येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची तपासणी करण्याची मोहीम पेण शहर पोलिसांनी हाती घेतली असून, या मोहिमेत रविवारी (दि. २४) १० ते १२ वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पेणनजीकच्या निसर्गसौंदर्याने नटलेल्या कासमाळ या पर्यटन स्थळाचे सौंदर्य पावसाळ्यात अधिकच खुलून येते. त्यामुळे येथे शनिवार, रविवार, सुट्टीच्या दिवसांत पर्यटकांची संख्या कमालीची वाढत आहे. मात्र काही अतिउत्साही पर्यटकांमुळे कासमाळ येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. काही पर्यटकांकडून स्थानिक महिलांची छेड काढणे, मोठ्या आवाजात गाणी वाजवून धिंगाणा घालणे, दादागिरी करणे तसेच कचरा करणे असे प्रकार होत असतात. अशा प्रकारांना चाप बसवण्याकरिता पेण शहर पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या आदेशाने आणि ग्राम सुरक्षा दल-बोरगांव यांच्या मदतीने कासमाळ येथे दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत विनाकागदपत्र असलेली वाहने, विनानंबर प्लेट, वाहतुकीचे नियम न पाळणे अशा १० ते १२वाहनचालकावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाहन चालकांवर रविवारी गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच काही गाड्यांच्या डिकीमधून मद्यसाठाही जप्त करण्यात आला.



(छाया : अनिस मनियार)

## डिकसळ येथून रिक्षा गेली चोरीला

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील डिकसळ येथील प्रवीण म्हसे यांची रिक्षा चोरीला गेली असून,



त्याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

डिकसळ येथील रोहित ढाबासमोर प्रवीण म्हसे यांनी रविवारी (दि. २४) रात्री आठ वाजता आपली रिक्षा (एमएच-४६,बीडी-३९८९) कर्जत-नेरळ रस्त्यावर उभी करून ठेवली होती. रात्री १० वाजता भाडे घेण्यासाठी घराबाहेर पडल्येल्या म्हसे यांना रिक्षा दिसून आली नाही. परिसरात शोध घेऊनही रिक्षा आढळून आली नाही.त्यामुळे त्यांनी नेरळ पोलीस ठाण्यात जाऊन हरवलेल्या रिक्षाबाबत तक्रार दिली. त्यानंतर पोलीस अधिकारी श्रीकांत काळे तसेच गणेश गिरी यांनी डिकसळ येथे येऊन परिसरात माहिती घेतली. त्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले.नेरळ पोलिसांकडून हरवलेल्या रिक्षाचा शोध सुरु केला.

## नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुरक्षा रक्षकाला मद्यधुंद व्यक्तींकडून मारहाण

**कर्जत : बातमीदार**

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुरक्षा रक्षकाला रविवारी (दि. २४) मध्यरात्री आलेल्या तीन मद्यधुंद व्यक्तींनी मारहाण केली. जखमी सुरक्षा रक्षकाने नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकाराने नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी घाबरले आहेत.

दयानंद अर्जुन भगत (रा. आंबिवली, ता. कर्जत) हे आयपीए या सुरक्षारक्षक कंपनीकडून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा बजावत असतात. रविवारी रात्री भगत हे सेवा बजावत असताना मध्यरात्री तीन तरुण तेथे आले. त्यांनी भगत यांना दरवाजा उघड असे सांगून धमकावण्याचा प्रयत्न केला. त्या तीन तरुणांनी सुरक्षारक्षक दयानंद भगत यांना मारहाण केली. त्यात भगत हे रक्तबंबाळ झाले. त्यांनी केलेल्या आरडाओरडा ऐकून दवाखाण्यात असलेल्या रुग्णांचे नातेवाईक तेथे आले. त्यांना पाहून तिघे तरुण नेरळ एसटी स्टॅंडकडे पळून गेले.

गंभीर जखमी झालेल्या सुरक्षारक्षक दयानंद भगत यांच्यावर उपचार करून नेरळ पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून दोन शाळांमध्ये लसीकरण शिबिर



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दीष्ट शासनाने जाहीर केले असून ते गाठण्यासाठी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने येथील दोन शाळांमध्ये लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पवार यांनी नेरळ विद्या मंदिर शाळेत, तर डॉ. सोनेगरा यांनी विद्या विकास मंदिर या शाळेत लसीकरण शिबिर घेतले. नेरळ विद्या मंदिरमध्ये आरोग्य सेविका घोडके, भोंगाडे, आरोग्यसेवक कांबळे, राठोड यांनी विद्यार्थ्यांचे लसीकरण करून घेतले. त्यांना मुख्याध्यापक पी. बी. विचवे, उपमुख्यध्यापक यांनी सहकार्य केले.

नेरळ विद्या विकास मंदिर शाळेत आरोग्यसेविका नगराळे, टोपले तसेच आरोग्यसेवक कवळे, नवाले यांनी विद्यार्थ्यांचे लसीकरण केले. त्यांना मुख्याध्यापिका शैलजा निकम, विनया काकडे यांच्यासह शिक्षकांनी सहकार्य केले. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुनील चव्हाण आणि पुंजारा यांनी नियोजनात सहभाग घेत लसीकरण शिबिरे यशस्वी केली. या शिबिरासाठी युनायटेड वेच्या हेमांगी भोईर आणि कश्यप जाधव या कार्यकर्त्यांनीही मदत केली.

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

## देवकान्हे येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि. २२) भाजप दक्षिण रायगड महिला मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्षा हेमाताई मानकर, जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, रोहा तालुका अध्यक्षा जयश्री भांड, जिल्हा कार्यकारिणी सदस्या नंदा नाकती, तालुका कार्यकारिणी सदस्या गीता डाके, तालुका युवामोर्चा सरचिटणीस अविनाश कान्हेकर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



(छाया : जितेंद्र जाधव)

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी दौड उपक्रमात सहभागी व्हावे

### पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांचे आवाहन



**पाली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सुधागड तालुक्यात १४ ऑगस्टपर्यंत स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी दौड आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी केले आहे.

पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या संकल्पनेतून १४ ऑगस्टपर्यंत स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी दौड आयोजित करण्यात आली आहे. ही दौड रोज सकाळी ७ ते ७.३० वाजता देऊळवाडा इथून सुरू होईल. तेथून सिद्धेश्वर ते एकवीस गणपती या मार्गवर चालेल. १४ ऑगस्टपर्यंत सर्वांनी एकूण ७५ किमी अंतर धावून पूर्ण करणे अपेक्षित आहे. या दौडमध्ये पोलीस तर असणार आहेतच पण त्याबरोबरच तालुक्यातील विद्यार्थी व नागरिकांनीदेखील सहभागी व्हावे. असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी केले आहे.

## खोपोलीत सर्पविषयक चर्चासत्र; ब्राह्मण सभेचा उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

साप या सरपटणाऱ्या प्राण्याविषयी जनसामान्यांच्या मनामध्ये असलेले गैरसमज, शंका-कुशंका आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी ब्राह्मण सभा या संस्थेने नुकताच खोपोलीत चर्चासत्र प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सर्पमित्र नवीन मोरे यांनी दृकश्राव्य माध्यमातून सापांविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच साप दिसला तर काय करायचे, साप चावला तर काय करायचे, सापाचे संवर्धन कसे करायचे इत्यादी विषयाचे मार्गदर्शन केले. प्रवीण तावडे, योगेश शिंदे, सुनील पुरी, चेतन चौधरी यांनी साप पकडण्याच्या साधनांची आणि उपकरणांची माहिती देऊन प्रात्यक्षिकदेखील या वेळी दाखवले.



(छाया : विनायक मांडप)

खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शिरीष पवार हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते सर्व सर्पमित्रांचा सन्मान करण्यात आला. सापाविषयी मनात असलेली दहशत व्यक्त करताना खोपोलीतील सर्व मित्रांचे सापाला वाचविण्यासाठीचे काम कौतुकास्पद असल्याचे शिरीष पवार यांनी सांगितले.

खोपोली ब्राह्मण सभेच्या सदस्यांनी या कार्यक्रमात भाग घेतला. सर्प मित्रांशी चर्चा करून आपल्या शंकांचे निरसनही करून घेतले. कार्यक्रम ठिकाणी सापांची विस्तृत माहिती दर्शवणाऱ्या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे, उपाध्यक्ष पाटणकर यांच्यासह सर्व पदाधिकारी आणि नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

## मुरूडमध्ये 'हर घर तिरंगा'ची जय्यत तयारी

**मुरूड : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत केंद्र सरकारने १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा' मोहीम राबविण्याची घोषणा केली आहे. मुरूड नगर परिषदे तर्फे या मोहिमेची जय्यत तयारी सुरू झाली असल्याची माहिती प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी दिली.

नागरिकांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात सहभागी होवून या हर घर तिरंगा मोहिमेला बळ देण्याचे काम करावे. या मोहिमेमुळे आपले राष्ट्रीय ध्वजाशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ होतील. नागरिकांनी आपल्या घरावर तीन दिवस तिरंगा फडकवण्याचे काम करायचे आहे. त्याबरोबर तिरंग्याचा अपमान होणार नाही त्याची दक्षता घ्यावी, असे आवाहन पंकज भुसे यांनी केले आहे.



(छाया : संजय करडे)

# राष्ट्रकुलमधून नीरजची माघार

## दुखापतीमुळे निर्णय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक सुवर्ण आणि जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा हा बर्मिंगहममध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेला मुकणार असल्याची माहिती भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव राजीव मेहता यांनी दिली. नीरज चोप्राने त्याच्या दुखापतीबाबत माहिती देत तो राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी होऊ शकत नसल्याचे सांगितल्याचे मेहता म्हणाले.

जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपदक स्पर्धेत ८८.१३ मीटर भालाफेक करून रौप्यपदक जिंकणाऱ्या नीरज चोप्राकडून येत्या २८ जुलैपासून सुरू होणाऱ्या बर्मिंगहम राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदकाचा दावेदार होता, मात्र जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपदक स्पर्धेत त्याला अंतिम फेरीवेळी दुखापत झाली होती. ही दुखापत गंभीर स्वरूपाची असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. त्यामुळे तो राष्ट्रकुल स्पर्धेत खेळणार नाही.

जागतिक अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत चौथ्या प्रयत्नावेळी नीरज चोप्राच्या मांडीचा स्नायू दुखावला होता, पण त्याने स्पर्धा पूर्ण करता यावी यासाठी मांडीला बँडेज बांधून भाला फेकला होता. अशा परिस्थितीही नीरजने ८८.१३ मीटर भाला फेककरीत रौप्यपदकाची कमाई केली. पदक जिंकल्यानंतर त्याने आपल्या दुखापतीबाबत सांगितले. याच वेळी तो ही दुखापत कितपत गंभीर आहे हे उद्या सकाळपर्यंत कळेल म्हणाला होता. आता राष्ट्रकुल स्पर्धेतून नीरजने माघार घेत्यानंतर त्याची दुखापत गंभीर स्वरूपाची असल्याचे सिद्ध झाले.

नीरजने यंदाच्या हंगामात ९० मीटर मार्क पार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याने याच वर्षी स्टोकहोम डायमंड लीग २०२२मध्ये आपलाच राष्ट्रीय विक्रम मोडला. त्याने ८९.९४ मीटर भाला फेकला होता. त्यामुळे या हंगामात तो ९० मीटर मार्क पार करणार अशी आशा होती, मात्र दुखापतीमुळे नीरज बॅकफूटवर गेला आहे.



# राज्य क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला १३ पदके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईच्या प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवनात झालेल्या राज्य सब ज्युनियर, ज्युनिअर, सीनिअर, मास्टर या पुरुष आणि महिला गटाच्या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी १३ पदके जिंकली. ही स्पर्धा महाक्रीडा प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत रायगडच्या कुणाल पिंगळे, कमल जोशी, अमृता भगत, निकर्ष जाधव, (ज्युनिअर स्पर्धा) व महेश कृष्णा पाटील (मास्टर स्पर्धा) यांनी सुवर्णपदक, विनायक मारुती पाटील (मास्टर स्पर्धा) व अथर्व लोधी (ज्युनिअर स्पर्धा) यांनी रौप्यपदक, तर आरती शिंदे (सब ज्युनिअर स्पर्धा), प्रथमेश भालेकर (ज्युनिअर स्पर्धा), प्रितम मंडल, रोशन पाटील, शुभम कांगले (सिनिअर स्पर्धा) व राजेश अगंद (मास्टर स्पर्धा) यांनी कांस्यपदक पटकाविले. या सर्व खेळाडूंना स्पर्धेच्या ठिकाणी राष्ट्रीय खेळाडू संतोष तुकाराम गावडे (अलिबाग) यांनी बहुमोल सहकार्य केले.

या यशाबद्दल रायगड जिल्हा संघटना अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य संदीप पाटकर, राहुल गजरमल आणि कार्याध्यक्ष यशवंत मोकल यांनी खेळाडूंचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी संजय सरदेसाई यांनीसुद्धा त्यांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत पेणच्या वंशला ‘रौप्य’

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारपाडा येथील वंश संजय घरत याने आळंदी (पुणे) येथे झालेल्या महाराष्ट्र स्टेट किक बॉक्सिंग या राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. यासोबतच त्याने खारपाड्यासह पेण तालुक्याचे नाव उंचावले आहे.

वंश घरत हा रायगड जिल्हा परिषदेच्या खारपाडा येथील प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. त्याला प्रशिक्षक रवींद्र म्हात्रे आणि प्रथमेश मोकल यांच्या किक बॉक्सिंगचे मार्गदर्शन लाभले. रौप्यपदक पटकाविल्याबद्दल वंशचे अभिनंदन होत आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील अनेक खेळाडू विविध स्पर्धांत चमकत आहेत.




## क्रीडा मंत्रालयाकडून लोव्हलिनाच्या आरोपांची दखल

**नवी दिल्ली** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा तोंडावर आली असताना मादक द्रव्य सेवन (डोपिंग) प्रकरणी काही खेळाडू दोषी आढळले आहेत. अशाच आता भारताच्या आलिम्पिक विजेती महिला मुष्टीयोद्धा (बॉक्सर) लोव्हलिना बोरगोहेन हिने आपला मानसिक छळ होत असल्याचा खुलासा केला आहे. दरम्यान, क्रीडा मंत्रालयाने लोव्हलिनाच्या आरोपांची घेतली दखल आहे. क्रीडा मंत्रालयाने ट्वीट केले की, आम्ही भारतीय ऑलिम्पिक संघटनेला ताबडतोब लोव्हलिनाच्या प्रशिक्षकांना मान्यता मिळण्यासाठी व्यवस्था करण्याची विनंती केली आहे.

# रामदास तडस महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी बरखास्त करण्यात आलेल्या महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेची निवडणूक आता होणार असून खासदार रामदास तडस यांची बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी तीन जणांनी अर्ज केले होते. त्यापैकी दोन जणांनी अर्ज मागे घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. काकासाहेब पवार आणि धवलसिंग मोहिते-पाटील यांनी आपले अर्ज मागे घेतले असून भाजपचे रामदास तडस यांची बिनविरोध निवड होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्षपद रामदास तडस यांनी भूषवले आहे. तडस हे स्वतः चार वेळा विदर्भ केसरी राहिले आहेत. तडस अजूनही अनेकदा कुस्तीच्या मैदानात उतरत असल्याचे पाहायला मिळते. काकासाहेब पवार सचिव, तर वैभव लांडगे उपाध्यक्षपदी असतील.



दरम्यान, याआधी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेकडून कोणत्याही स्पर्धेचे आयोजन करण्यात येत नसल्यामुळे ती बरखास्त करण्यात आली होती. आम्ही १५ वर्षांखालील स्पर्धेचे आयोजन त्यांना करायला सांगत होतो, पण ऐनवेळी त्यांनी यासाठी नकार दिला. त्याचप्रमाणे २०१९मध्ये २३ वर्षांखालील स्पर्धेचे आयोजन करण्यासही ते तयार नव्हते, भारतीय कुस्ती संघटनेचे सहाय्यक सचिव विनोद तोमर यांनी सांगितले होते. त्यानंतर आता महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होत असून रामदास तडस यांची बिनविरोध निवड होणार आहे.

तडस अध्यक्ष व त्यांचे १२ समर्थक नव्या कार्यकारिणीत असतील. २९ जुलैला त्यांची बैठक होणार असून ३१ जुलै रोजी औपचारिक निकाल जाहीर केला जाणार आहे.

# भारताची आणखी एक धावपटू उत्तेजक चाचणीत दोषी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेआधी भारताला पुन्हा धक्का बसला असून महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिले संघातील एक धावपटू उत्तेजक द्रव्य चाचणीत दोषी आढळली आहे, मात्र दोषी आढळलेल्या खेळाडूचे नाव स्पष्ट झालेले नाही.

‘राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी होणाऱ्या रिले संघातील एक धावपटू उत्तेजक चाचणी दोषी आढळली असून तिने स्पर्धेतून माघार घेतली आहे,’ अशी माहिती सूत्रांनी दिली. या खेळाडूने स्पर्धेतून माघार घेतल्याने केवळ चार धावपटूंसह भारताचा ४ बाय १०० मीटर रिले संघ बर्मिंगहॅमसाठी रवाना झाला. या संघातील कोणात्याही धावपटूला दुखापत झाल्यास अन्य धावण्याच्या स्पर्धेतील खेळाडूला तिची जागा घेता येईल, मात्र याचा फटका संघाच्या कामगिरीला बसू शकतो.

भारतीय अ‍ॅथलेटिक्स महासंघाने सुरुवातीला द्युती चंद, हिमा दास, स्रबनी नंदा, एनएस सिमी, सेकर धनलक्ष्मी आणि एमव्ही जिल्ना या धावपटूंचा ३७ सदस्यीय भारतीय अ‍ॅथलेटिक्स चमूमध्ये समावेश केला होता, पण भारताला ३६ खेळाडूंचीच परवानगी मिळाल्याने जिल्नाला संघातून वगळण्यात आले, मात्र नंतर धनलक्ष्मी उत्तेजक चाचणीत दोषी आढळल्यामुळे तिच्या जागी पुन्हा जिल्नाला संघात स्थान मिळाले. धावपटू सेकर धनलक्ष्मी आणि तिहेरी उडीपटू ऐश्वर्या बाबू या यापूर्वी उत्तेजक चाचणीत दोषी आढळल्या होत्या.

# भारताने मोडला पाकचा विश्वविक्रम

## एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक सलग मालिका जिंकण्याची कामगिरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत पहिले दोन सामने जिंकून २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. यासोबतच भारताने पाकिस्तानचा विश्वविक्रम मोडला आहे. टीम इंडियाने विंडीजविरुद्धचा दुसरा एकदिवसीय सामना जिंकून एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक सलग द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकण्याची कामगिरी केली आहे.

भारताने वेस्ट इंडिजविरुद्धची सलग बारावी द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकून पराक्रम केला आहे. २००७ ते २०२२ या काळात भारतीय संघाने विंडीजविरुद्ध खेळली गेलेली प्रत्येक एकदिवसीय मालिका जिंकली आहे. अशी कामगिरी करून भारताने पाकिस्तानला मागे टाकले. यापूर्वी पाकिस्तानने झिम्बाब्वेविरुद्ध सलग ११ एकदिवसीय मालिका जिंकून विश्वविक्रम केला होता. आता भारताने पाकिस्तानचा हा विश्वविक्रम मोडला आहे.

भारताने रविवारी झालेल्या रोमहर्षक सामन्यात वेस्ट इंडिजचा दोन गडी राखून पराभव केला. विंडीजने निर्धारित ५० षटकांमध्ये सहा गडी गमावून ३११ धावा केल्या होत्या. त्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने शेवटच्या षटकात विजय मिळवला. भारताकडून अक्षल पटेलने ३५ चेंडूत ६४ धावांची निर्णाय खेळी केली. तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना बुधवारी (दि. २७) पोर्ट ऑफ स्पेन येथे होणार आहे.





# रोबोटने चेस खेळताना तोडले सात वर्षांच्या मुलाचे बोट

**मॉस्को : वृत्तसंस्था**

काळाच्या ओघात रोबो माणसाच्या सामान्य जीवनात मिसळत आहेत, पण रशियाच्या मॉस्कोमध्ये घडलेल्या एका घटनेने लोकांमध्ये रोबोट्सबद्दल भीती निर्माण झाली आहे.

गेल्या आठवड्यात रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये बुद्धिबळाचा सामना सुरू होता. यादरम्यान एका रोबोटने सात वर्षांच्या मुलाचे बोट तोडले. एका रशियन वृत्तपत्राने या घटनेची माहिती दिली आहे. टास वृत्तसंस्थेशी बोलताना मॉस्को बुद्धिबळ महासंघाचे अध्यक्ष सर्गेई लाजरेव्ह म्हणाले की, रोबोटने मुलाचे बोट तोडले. हे खरंच वाईट आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये रोबोट आणि मुलामध्ये बुद्धिबळाचा सामना पाहायला मिळत आहे.



व्हिडिओमध्ये, रोबोटने सुरुवातीला बुद्धिबळाच्या पटावरील मुलाच्या बाजूची एक सोंगटी उचलली आणि बाहेर ठेवली. यानंतर मुलगा आपली चाल खेळायला गेला पण रोबोटने त्याचे बोट पकडले. १९ जुलै रोजी झालेल्या सामन्यात हा अपघात झाला आहे. त्यामुळे तेथे उपस्थित लोकांमध्ये एकच खळबळ उडाली. चार माणसे मुलाच्या मदतीसाठी पुढे येतात आणि अखेरीस त्याला रोबोटच्या पकडीतून सोडवतात. लाजरेव्ह म्हणाले की, या मशीनने यापूर्वी अनेक सामने कोणत्याही अपघाताशिवाय खेळले आहेत.

लहान मुलाच्या घाईमुळे हा अपघात झाल्याचे लाजरेव्ह यांनी सांगितले. आम्ही रोबोटला कामावर घेतले होते. बऱ्याच दिवसांपासून तज्ज्ञांसोबत वेगवेगळ्या ठिकाणी त्याचे प्रदर्शन सुरू आहे, असेही ते म्हणाले.

खेळताना रोबोट चालकाने दुर्लक्ष केले. चाल खेळल्यानंतर रोबोटला प्रतिक्रिया देण्यासाठी वेळ द्यावा लागतो, पण मुलाने घाई केल्याने रोबोटने त्याचे बोट पकडले, असे त्यांनी सांगितले.

# उपविजेतेपदाचे श्रेय संपूर्ण संघाला -चव्हाण



**मुंबई : प्रतिनिधी**

वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या उपविजेतेपदाचे श्रेय संपूर्ण संघाला असल्याचे प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी म्हटले आहे तसेच तंदुरुस्ती तज्ज्ञ पुरुषोत्तम प्रभू, व्यवस्थापक अयूब पठाण यांचेही महत्त्वाचे योगदान होते, असे त्यांनी सांगितले.

भारतीय रेल्वेकडून अंतिम फेरीत २१-३८ असा पराभव पत्करल्यामुळे महाराष्ट्राचे जेतेपद हुकले, पण हरियाणावर मिळवलेल्या ३३-२७ अशा विजयामुळे महाराष्ट्राने राष्ट्रीय स्पर्धेत दरारा निर्माण केला. या सामन्याबाबत चव्हाण म्हणाले, हरियाणाच्या संघातील सर्वच १२ खेळाडू प्रो कबड्डी गाजवणारे होते, तर महाराष्ट्राच्या संघातील फक्त अस्लम इनामदार आणि आकाश शिंदे यांनाच एक-दोन वर्षांचा अनुभव होता, पण सामर्थ्यशाली हरियाणाचे या स्पर्धेतील आधीचे सामने तसेच यू-ट्यूबवरील चित्रफिती पाहून प्रदीप नरवाल, संदीप नरवाल यांच्या खेळाचा व्यवस्थित अभ्यास आम्ही केला होता.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com